ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मार्च २०१२ • मूल्य १० रुपये




**चित्रपटजनकाचा कुटुंबपट**
प्रभाकर भिडे

**कर्क–वृत्त**
डॉ. उज्ज्वला दळवी

**बी. एच. मर्लापल्ले**
प्रवीण बर्दापूरकर

**गोंडवनात मराठीचा जयजयकार**
प्राचार्य मदन धनकर





चंद्रपूर संमेलनात प्रभा पुरोहित यांच्या 'वेचक व्हिएतनामी लोककथा' या पुस्तकाचे प्रकाशन.
डावीकडून तिसऱ्या उषा तांबे, संमेलनाध्यक्ष वसंत आबाजी डहाके, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे आणि लेखिका प्रभा पुरोहित

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**मार्च २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४३०६६२४
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

चंद्रपूर साहित्य साहित्य संमेलनानिमित्त 'रुची'च्या विशेषांकामधून विदर्भातील घडामोडी पाहिल्या. संमेलनाची सांगता यशस्वी झाली. त्याला उदंड प्रतिसाद लाभला. त्याचा वस्तुनिष्ठ आढावा संमेलनाचे एक आयोजक, प्राचार्य मदन धनकर या अंकात घेत आहेत.

डॉ. उज्ज्वला दळवी यांनी गेले वर्षभर अनुवंशशास्त्राची तोंडओळख करून देणारी लेखमाला लिहिली. त्यांची खुसखुशीत आणि सोपी शैली वाचकप्रिय आहेच, त्यांच्या या लेखमालेने जेनेटिक्स सुबोध करून सांगितले. ही लेखमाला आता समाप्तीकडे आली आहे. एप्रिलच्या अंकात लेखमालेतील शेवटचा लेख प्रसिद्ध होईल.

१६ फेब्रुवारी हा दादासाहेब फाळके यांचा स्मृतिदिन. प्रभाकर भिडे यांनी भारतीय चित्रपटसृष्टीच्या या जनकाच्या वारसांची भेट घेऊन, त्यांच्या कौटुंबिक वाटचालीची आगळी माहिती दिली आहे.

आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष १२ मार्च २०१२ रोजी सुरू होत आहे. सत्ताधिशाकडे एक डोळा सांस्कृतिक असला पाहिजे असे यशवंतराव म्हणत. ते तसेच जगले. साहित्य–कला–संस्कृती जपणाऱ्या संस्था त्यांनी निर्माण केल्या. ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्वांना जाणीवपूर्वक अशा संस्थांत येण्यास प्रवृत्त केले. त्यांना स्वातंत्र्याची हमी दिली. त्यातून सर्वांगीण विकास होत हे राज्य देशात अग्रेसर झाले. गेल्या काही वर्षांत त्यास उतरती कळा लागली आहे. जंगलराज मानले गेलेले बिहार येत्या काही वर्षांत देशात अग्रेसर होईल. आपल्याकडे मात्र दादा, बाबा, आबा, अण्णा, काका, पुतण्या अशी संबोधने असलेल्या, राजकीय–सामाजिक क्षेत्रावर प्रभाव असणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना कुठले विषय महत्त्वाचे वाटतात, ते काय पातळी गाठतात हे आपण पाहत आहोत. एकमेकांचे वस्त्रहरण करून जी नवसंस्कृती रुजत आहे, भ्रष्टाचार या शब्दावर जी 'कृपा' होत आहे ती पाहता, या राज्यात राजकीय–सामाजिक 'बदनाम'कोशच लिहिला जाऊ शकतो.

यशवंतरावांची जन्मशताब्दी साजरी करताना, त्यांच्या आठवणींना उजाळा देताना, त्यातून बोध घेऊन कृती करण्याचे भान ठेवले तरच कृष्णाकाठ सुखावेल.

**– संपादक**

# कर्क-वृत्त

**डॉ. उज्ज्वला दळवी**

चंद्रसूर्यांना ग्रासणारा राहू हा कश्यपमुनींचा पुत्र. त्यांच्याच शापानं त्याला जन्मतःच मृत्यूसारखं भयावह रूप लाभलं, असं विष्णुपुराणातल्या कथेत सांगितलं आहे. तो चोरून अमृत पीत असताना विष्णूनं त्याचा शिरच्छेद केला. तोवर जे काही अमृताचे थेंब त्याच्या तोंडात गेले होते त्यांमुळे त्याचं धडावेगळं शिर अमर झालं. असं ते विकृत, भयानक मुंडकं, चंद्रसूर्यांसारख्या तेजस्वी ग्रहगोलांचा आसुरी सूडबुद्धीनं घास घेतं.

राहूचं हे वर्णन कर्करोगाला तंतोतंत लागू पडतं. कर्करोगात विकृती आहे, विद्रूपता आहे. तो मृत्यूचा प्रतिनिधी असला, जीवनाला ग्रासून टाकत असला तरी, दुर्दैवानं त्याच्या पेशींना अमरत्वाचा शाप आहे. राहूसारखाच कर्करोगही या पृथ्वीवरच्या जीवसृष्टीला पुरातन काळापासून ग्रासतो आहे. चार हजार वर्षांपूर्वीच्या इजिप्शियन पॅपिरसमध्येही एका भल्या-थोरल्या कर्कग्रंथीचं चित्र आणि वर्णन आहे. त्याहूनही पूर्वीच्या काळातल्या, सुमारे वीस कोटी वर्षांपूर्वीच्या डायनोसॉरांनाही कॅन्सरच्या गाठी होत्या. त्यांचे जनुक-पुरावे सापडले आहेत.

कसा होतो हा कर्करोग? त्याच्या पेशी सामान्य पेशींहून कशा वेगळ्या असतात?

जसा राहू जन्मजातच विकृत होता, त्याचप्रमाणे कर्कपेशींच्या घडणावळीतच विकृती असते. कुठल्याही पेशीची घडणावळ, तिचं दैनंदिन काम हे तिच्या जनुकांत नोंदलेल्या संदेशांवर अवलंबून असतं. पेशींच्या कारखान्याबद्दल बोलताना आपण पाहिलं होतं, की आपला जनुकसंचय DNAचा बनलेला असतो. ही DNAची लांबलचक पिळदार शिडी जनुकाक्षरांच्या लाखो शब्दांनी बनलेली असते. आनुवंशिक रूप-गुण-आजार इतकंच नव्हे, तर आपल्या शरीराचे सगळे दैनंदिन व्यवहार, बालपणीची निकोप वाढ, वयात येणं, मातृत्वासारखी जबाबदारी पेलणं, वयोमानाप्रमाणे म्हातारं होणं, योग्य वेळी देह त्यागणं... या सगळ्याचं वेळापत्रक आणि त्याबाबतीतले पोषणाच्या जमाखर्चाचे आडाखे; हे सारं या पीळदार शिडीलेखात नोंदलेलं असतं. या लेखाबरहुकूम प्रथिन-संदेश बनवले जातात. या जनुक-लेखाकडून येणाऱ्या प्रथिन-संदेशांशी सर्वसामान्य पेशींचा अव्याहत सुसंवाद चालत असतो.

दर वेळी पेशींचं विभाजन होताना या संपूर्ण शिडीची हुबेहूब कॉपी काढली जाते. लाखो शब्दांची कॉपी निघताना कुठे ना कुठे चुका ह्या होणारच. अशा चुका बऱ्याच वेळा निरुपद्रवी असल्या तरी काही वेळा भलते अनर्थ उद्भवतात. विकृत प्रथिनं घडवली जातात. परिणामी, जनुकं आणि पेशी यांच्यातला संवाद बिनसतो.

कर्कपेशींच्या DNAमध्ये तर अशा अनेक चुका साठलेल्या असतात. त्यांनी त्यांचा जनुक-लेख गिरमिटून जातो. त्यातून पेशींच्या कामकाजासाठी असंबद्ध, अनर्थकारी प्रथिन-संदेश मिळतात आणि एका पेशीचा किंवा अवयवाचाच नव्हे, तर समग्र शरीराचा ताळेबंद विस्कटू शकतो,

तीस वर्षांपूर्वीपर्यंत कर्करोगाच्या विविध कारणांचे अभ्यास वेगवेगळ्या प्रयोगशाळांत चालू होते. विषाणू, प्रदूषणं, घातक किरण वगैरे प्रत्येक दुष्ट प्रवृत्तीचा कर्करोपणाचा मार्ग वेगळाच असेल असं शास्त्रज्ञांनी गृहित धरलेलं होतं. पण एका जनुकसंचयातला DNA दुसऱ्या पेशीकेंद्रात रुजवणं सुमारे तीस वर्षांपूर्वी जमलं. आणि त्या अनुषंगाने हे कळलं की बहुतेक कर्कगाठींमध्ये वृद्धिरोधक जनुकांची मुस्कटदाबी झालेली असते. पन्नास टक्क्यांहून अधिक कॅन्सरमध्ये, p53 या वृद्धिरोधकात हानिकारक बदल झालेले असतात. वारसा, विषाणू, प्रदूषणं, प्रखर किरण सारे एकाच कर्कवाटेवरून, एकमेकांना हात देत चालतात.

साऱ्या देहात अराजक माजतं.

या चुकांच्या तऱ्हा अनेक असतात.

कधी एखादं अक्षर वेगळंच लिहिलं जातं. असे 'ध'चे 'मा' होणं म्हणजेच किंवा जनुकपालट.

पेशीच्या विभाजनाच्या वेळी कधीकधी काही जनुकशब्द चुकून पूर्णपणे गाळले गेले (deletion), अधिकचे घातले गेले (insertion) किंवा बदलले गेले (substitution) तर पेशीच्या रोजच्या कामकाजात साफ वेगळे संदेश दिले जातात आणि अतर्क्य गोंधळ उडू शकतो. नेहमीच्या भाषेतली उदाहरणं द्यायची तर 'वाघाची मावशी चोरून दूध पिते'च्या जागी 'मावशी चोरून दूध पिते' इतकंच उरलं तर गोंधळ उडणारच. 'मुलगी आली'च्या ऐवजी 'मुलगी वयात आली' म्हटलं, की त्या अधिकच्या 'वयात' या शब्दानं अर्थ पार बदलतो. 'घोडा धावत गेला'मधल्या 'धावत'च्या जागी 'मरून' हा शब्द घातला, की तर वाक्याला गंभीर कलाटणी मिळते.

'बाईनं घागरीतून पाणी भरून नेलं', आणि 'शिंप्यानं सुईच्या नेढ्यातून दोरा ओवून घेतला', या दोन वाक्यांत गल्लत झाली तर त्यांच्या जागी 'बाईनं घागरीतून दोरा ओवून घेतला', आणि 'शिंप्यानं सुईच्या नेढ्यातून पाणी भरून नेलं' अशी नवी निरर्थक वाक्यं बनू शकतात. अगदी याच पद्धतीनं जनुककोशातलं एका ठिकाणचं अर्धं रंगसूत्रच निसटून दुसऱ्याच ठिकाणच्या, पूर्णपणे वेगळ्या रंगसूत्राला जाऊन चिकटलं (translocation), तर एकमेकांशी तोवर काहीही संबंध नसलेले दोन वेगवेगळे जनुक-तुकडे त्या जोडणीपाशी एकमेकांशी सांधले जातात. अशा वाट चुकलेल्या सांधणीतून नवी कुचकामी किंवा दुष्कर्मी जनुकं उद्‌भवू शकतात. ल्युकेमियाच्या एका प्रकारात, BCR आणि ABL हे दोन वेगवेगळ्या जनुकांचे विभिन्न तुकडे अपघातानं एकत्र जुळून नवं घातक जनुक बनलेलं असतं. याच्याकडून उपजणारा Bcr-Abl हा विकृत प्रथिन-संदेश पांढऱ्या रक्तपेशींना वाढीचं आणि पुनरुत्पादनाचं काम अविश्रांतपणे करायला लावतो.

काही जनुकवाक्यांमध्ये (proto-oncogenes = वृद्धिजनुकं) पेशीच्या वाढीचे आदेश दिलेले असतात. या वृद्धिजनुकांमध्येही अशा 'ध'-'मा'च्या चुका होतात, शब्द गाळले जातात किंवा एखादं भलतंच वाक्य येऊन त्यांच्यात घुसतं. मूळ आदेशातले हे बदल, वाढीच्या आणि विभाजनाच्या प्रक्रियेला टाच मारून, तिची गती भरधाव करू शकतात.

जनुकांचं एक ras नामक घराणं आहे. माणसांना होणाऱ्या कर्कबाधेपैकी सुमारे पंचवीस टक्के बाधा या घराण्याच्या 'कर्तबगारी'मुळे होते. पेशीबाहेरून आलेल्या संदेशांनी ही ras-जनुकं जागी होतात आणि त्या संदेशाने पेशीतल्या इतर अनेक जनुकांना सजग करतात. ज्या जनुकासाठी तो संदेश आलेला असतो तेही त्यामुळे जागं होऊन योग्य कामाला लागतं. या ras-जनुकांत चुकीचे फेरफार झाले, की ती स्वतः तर कारणाशिवाय सतत जागी राहतातच, शिवाय त्यांच्याकडून 'जागो, जाऽऽगोऽऽ रेऽऽ'चा निरंतर पुकाराही होत राहतो. त्यामुळे अनेक वृद्धिजनुकंही विनाकारण चाळवली जातात. पेशींत वृद्धिकल्लोळ माजतो. अशा सैरभैर झालेल्या पेशींत विकृत वाढ अनावर होते.

उत्क्रांत, प्रगत प्राण्यांमध्ये यकृताच्या पेशी वेगळ्या, मूत्रपिंडाच्या वेगळ्या, मज्जापेशी त्यांहूनही वेगळ्या असतात. सगळ्या पेशींमध्ये तीच जनुकं असतात. मग कुठल्या पेशीनं कुठलं काम करावं ते कसं ठरतं? कामांची विभागणी करताना मूत्रपिंडाच्या पेशीतली यकृताचं काम करणारी जनुकं गुंडाळून, त्यांवर खुंट्या ठोकून ती निकामी केली जातात. तशीच यकृताच्या पेशीतली मूत्र तयार करणारी जनुकं बाद केलेली असतात. जनुक-चुकांच्या गोंधळानं कर्करोग झाला, की पेशींमधला हा भेदभाव संपतो. तोपर्यंत बिनबोभाट काम करत असलेली काही जनुकं नष्ट केली जातात तर काही तोवर मुद्दाम निकामी ठेवलेली जनुकं कंबर कसून कामाला लागतात. परिणामी, यकृताची पेशी मज्जापेशीचंही काम करू शकते. कुठलीही पेशी मन मानेल ते कुठलंही काम करायला लागते (de differentitaion).

प्रत्येक रंगसूत्राच्या टोकाला CCC-CAA-CCC-CAA- अशी क्क्क्का-क्क्का-ची पुनरुक्ती करणारी DNAची शेपटी असते. DNAची कॉपी करणाऱ्या RNA ला या शेपटीचं टोक आधाराला पकडावं लागतं. त्यामुळे त्या पकडलेल्या टोकाची कॉपी केली जात नाही. परिणामी, दर विभाजनानंतरच्या कन्यापेशींत या शेपटीची लांबी कमी कमी होत जाते. सुमारे सत्तर विभाजनांनंतर ही शेपटी इतकी आखूड होते, की पुढच्या कॉपीसाठी आधार द्यायला ती अपुरी पडते. त्यानंतर त्या कन्यापेशींचं विभाजन होऊ शकत नाही. त्यामुळे त्या मरतात. कर्करोगाच्या पेशींत ही शेपटी मारुतीच्या शेपटीसारखी सतत लांब होत राहते. पेशींचं विभाजन अगणित वेळा चालत राहतं. त्या अमर होतात.

मार्कंडेय पुराणात रक्तबीजाची गोष्ट आहे. या राक्षसाच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून त्याच्यासारखाच नवा वीर तयार होई आणि तशा वीरांची सेना उभी ठाके. त्याचप्रमाणे विकृत जनुक-घडण असलेल्या एकाच कर्कपेशीच्या अनिर्बंध पुनरुत्पादनानं तीच जनुक-विकृती असलेल्या शेकडो पेशी हां हां म्हणता उत्पन्न होतात.

आपल्या शरीरातल्या लाखो पेशींचं गरजेनुसार विभाजन चालूच असतं. त्यांच्यात अशा चुका होतच असणार. मग सर्वांस प्रत्येकालाच कर्करोग का होत नाही? सर्वसामान्य पेशींमध्ये कर्करोग उद्‌भवू नये म्हणून अनेक प्रतिबंधक उपाय योजलेले असतात.

वार्धक्याचा विचार करताना आपण WRN जनुकाची ओळख करून घेतली होती. या सारखी काही प्रूफरीडर जनुकं (DNA repair genes) या चुका टिपायला, त्या तत्परतेनं खड्यासारख्या वेचून काढायला सज्जच असतात.

या प्रूफरीडरांच्या नजरेतून काही चुका निसटतात. या चुकांमुळे अनिर्बंध वाढ

संभवते. पण पेशीच्या वाढीच्या गतीवर लक्ष ठेवणारी काही वृद्धिरोधक जनुकं (tumour suppressor genes) असतात. ती अशी रोगट वाढ थोपवतात. जर वाढ आटोक्यात येत नाही असं वाटलं तर ही जनुकं (विशेषतः p53 नावाचं जनुक) पेशीला आत्महत्या करायला लावतात. पेशींच्या अशा हाराकिरीला apoptosis म्हणतात. पेशी मरूनच गेली की तिच्यातले जनुकदोष फैलावू शकत नाहीत.

थोडक्यात काय, सर्वसामान्य पेशी ही एखाद्या तालेवाराच्या वाड्यासारखी असते. तिच्या दैनंदिन वावरातली सगळी कामं शिस्तीत पार पडतात. रोजची हाताखालची कामं करणारी कामकरी-जनुकं असतात. त्यांच्या कामात काही बिनसलं, कुठे सांड-लवंड (deletion) झाली, देवपूजेला उदबत्तीऐवजी सिगारेट (mutation) पेटवली, कधी चुकून म्हैस बैलाच्या दावणीला बांधली गेली (translocation); तर त्या चुका तत्काळ निस्तरणारी कारभारी-जनुकं (DNA repair genes) असतात. घरादाराला नजरेच्या किंवा शब्दांच्या वचकात ठेवणाऱ्या गृहिणी (tumour suppressor जनुकं) असतात. याशिवाय काही दासी-जनुकंही (proto-oncogenes) असतात. घरातलं दुभत्याचं फडताळ, धान्याचं कोठार भरायचं काम त्यांच्याकडे असतं. त्यांच्या कामांनी घराची भरभराट होते. पण या समृद्धी घडवणाऱ्या दासी-जनुकांचा (proto-oncogenes) मूळ स्वभाव चंचल असतो. जर विषाणूंच्या जनुकांची, तंबाखूतल्या रसायनांची, अशी कुठली बाहेरची दुष्ट संगत लागली की अशा एखाद्या दासीचा मूळचा उच्छृंखल स्वभाव उफाळून येतो. पण सगळ्या जनुकसंचयाच्या कामावर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवणारी कारभारी-जनुकं आणि गृहिणीजनुकं या उठवळ दासीला तत्काळ वठणीवर आणतात.

प्रत्येक पेशीच्या जनुकसंचयात अशी अनेक रक्षणकर्ती जनुकं असतात. बऱ्याच जनुक-चुका जमा होऊन, त्यांच्या सैन्यानं अशा अनेक रक्षक जनुकांचा आणि प्रतिबंधक योजनांचा पाडाव केला तरच कर्करोग मूळ धरू शकतो.

मोटारगाडीला जसे पायाचा आणि हाताचा असे दोन ब्रेक असतात तशी ह्या जनुकांचीही जोडी असते. त्यामुळे त्यांच्यापैकी एक गैरहजर असलं आणि दुसरं जनुकपालटानं सदोष झालं तरच ती दुक्कल दुर्बळ होते. मोटारगाडीचा हँडब्रेक नादुरुस्त झालेला असला आणि साधा ब्रेकही नीट लागत नसला तरच अनवधानानं दाबलेला ॲक्सिलरेटर गाडी खड्ड्यात घालायला पुरेसा असतो, त्याचप्रमाणे ज्या लोकांत हे वृद्धिरोधक जनुकांतले आणि इतरही रक्षक जनुकांतले फेरफार आढळतात, त्यांच्यात जनुकीय कल कर्करोग होण्याकडे असतो. इतर काही कारणांनी दुसरा कुठलाही अधिकचा जनुकदोष उद्‌भवला, की मग तेवढं निमित्त कर्करोग होण्यासाठी त्यांना पुरतं.

पेशींच्या गाडीचे दोन्ही ब्रेक एका दमात निकामी होत नाहीत. अनेक जनुकपालटांनी हळूहळू गंजून, आधी एक, मग काही काळाने दुसरा असे ते सावकाश कामातून जातात. ॲक्सिलरेटरवर नव्या जनुक-चुकांचा पाय दाबला जायला त्यानंतर आणखी काळ लोटतो. त्यामुळे जनुक-संचयावर रासायनिक, भौतिक, जैविक आघात झाल्यापासून कर्करोगाचा जम बसेपर्यंत, कधी कधी वीस-पंचवीस वर्षं देखील उलटून जातात.

वय जसजसं वाढत जातं तसतसा पर्यावरणातल्या कर्कजन्य पदार्थांशी, किरणांशी संबंध यायला अधिक काळ मिळतो. पेशीत अधिकाधिक जनुक-चुका साठत जातात आणि शेवटी कधीतरी असा चुकांचा घडा भरतो. त्यामुळे पंचवीस वर्षांच्या नातवापेक्षा पाउणशे वयमान झालेल्या आजोबांमध्ये आतड्याचा कॅन्सर होण्याची शक्यता शंभर पटींनी अधिक असते.

कधी कधी वचक ठेवणारी जनुकं मुळातच कमजोर असतात. कधी बाहेरून येणारे विषाणूंसारखे किंवा रसायनांसारखे दुष्ट हस्तक त्यांना हतबल करतात. असं झालं की मात्र द्वाड दासी-जनुकांचं चेटकिणींत (oncogenes म्हणजे कर्कजनुकं) रूपांतर होतं. त्यांचं काळं चेटूक वाड्याची शिस्त बिघडवतं. भरमसाठ धनधान्य, दूधदुभतं भरलं जातं. नवख्या, विकृत प्रथिन-नोकरांचा सुळसुळाट होतो. मूळचा सुबक, नांदता वाडा उद्‌ध्वस्त होतो आणि त्याच्या जागी अनिर्बंध, बेशिस्त अशी अफाट गलिच्छ वस्ती (cancer) फोफावते. तिच्यात या चेटकिणींच्या गोतावळ्याचा बेबंद कारभार चालतो.

अशा द्वाड दासी आणि दुर्बळ रक्षक-जनुकं जर मूळच्या जनुकसंचयातच असली, तर त्याचा अर्थ कर्करोग आनुवंशिक असतो का? एखाद्या माणसाच्या आईला, मावशीला किंवा आजोबांना हा आजार असला तर तो त्या माणसाला होण्याचा संभव अधिक असतो का? हो. कर्करोगाच्या पाच ते दहा टक्के रुग्णांत तो आजार आनुवंशिक असतो.

BRCA1 आणि BRCA2 ही खरं तर दोन वृद्धिरोधक जनुकं आहेत. त्यासोबत ती थोडं जनुक-चुका वेचायचं कामदेखील करतात. काही जनुकपालट झाल्यानं त्यांची ही कामं ठप्प होतात. हे जनुकपालट वारसा म्हणून मिळतात आणि स्तनांच्या आणि अंडकोशांच्या (ovaries) कर्करोगाकडे कल वाढवतात. काही यहुदी जमाती बाकीच्या जगाशी रोटी-बेटी-संपर्क तोडून, शेकडो वर्षं आपल्या स्वायत्त ज्ञातिकोशात गुरफटून राहिल्या. त्यांच्यात या दोन्ही जनुकपालटांचं, आणि अर्थातच, त्यामुळे स्तनाच्या आणि अंडकोशाच्या कर्करोगाचं प्रमाण फार वाढलं आणि अजूनही ते मोठंच राहिलेलं आहे.

इतर काही वृद्धिरोधकांतले (APC, इत्यादी) असेच फेरफार मोठ्या आतड्याच्या कर्करोगाला जबाबदार असतात. हेसुद्धा आनुवंशिक असतात. मूत्रपिंड, नेत्रपटल, अस्थी वगैरेंच्या कर्करोगाची काही जनुकं-देखील अशी वंशपरंपरेनं चालत येतात. आणि काही रक्षक-जनुकांतल्या दोषांमुळे तर वेगवेगळ्या अवयवांच्या कर्कबाधेची फौजच शरीरावर चाल करून येते (Cancer

associated syndromes).

HER2 हे स्तन-पेशींमधलं एक वृद्धिजनुक. त्याच्यापासून तयार होणारं प्रथिन त्या पेशींना धष्टपुष्ट व्हायचा, विभाजनाचा संदेश देत असतं. जोवर या जनुकाची एकच जोडी पेशींमध्ये असते तोवर सगळं ठीक चालतं. पण काही वेळा अशी दोनाहून अधिक जनुकं असतात. पेशींच्या वाढीला भरभरून प्रोत्साहन मिळतं, त्या गरगरून वाढतात. मग विभाजनानं त्यांची संख्याही झपाट्याने वाढत जाते, आवाक्याबाहेर जाते. अशी बेलगाम वाढ म्हणजेच कर्करोग.

ही कर्करोगाच्या आनुवंशिक उद्भवाची काही उदाहरणं झाली. पण आनुवंशिकतेनं कर्करोगाकडे नुसता कल असतो. रोगाचा प्रादुर्भाव होण्यासाठी त्याला विषाणू, पर्यावरणातली विषं, घातक किरण यांसारख्या इतर कारणांचीही जोड लागतेच.

विषाणू, जिवाणू यांच्या लागणीमुळे निपजणारे कर्करोगाचे काही प्रकार संसर्गजन्य म्हणता येतील.

मानवी कर्करोगापैकी बारा-तेरा टक्के व्याधी विषाणूंमुळे उद्भवतात. कर्कजनुकांच्या अभ्यासाच्या इतिहासात विषाणूंनी फार मोलाची कामगिरी बजावली आहे. वृद्धिजनुकांचा आणि वृद्धिरोधकांचाही शोध लागला, तो उरफाट्या विषाणूंचा (retroviruses) मागोवा घेतानाच.

हे संसर्गजन्य कर्क-परिवर्तन काही ठिकाणी जलद होतं. त्यांच्यात कर्कबीज रोवणारी वृद्धिजनुकं विषाणूच्या जनुक-कोशातून दिली जातात. या आयत्या विषाणू-जनुकांची अभिव्यक्ती झाली की लगेचच त्या पेशीचं कर्कपेशीत रूपांतर होतं. गर्भाशयाच्या तोंडाचा कॅन्सर (मानवी चामखिळींच्या विषाणूमुळे होतो), यकृताचा कॅन्सर (एका प्रकारच्या काविळीच्या विषाणूंनी होतो) ही अशा जलद कर्कपालटाची उदाहरणं.

विषाणू पेशीत शिरून तिथे कर्कबीज रोवतात हे तत्त्व, प्रथम कोंबड्यांमधल्या कॅन्सरच्या अभ्यासामुळे सर्वमान्य झालं. पण मग असं दिसलं, की काही विषाणूंची जनुकं काही मानवी जनुकांना जाऊन चिकटतात आणि त्यांचं काम बंद करतात किंवा मंद करतात. मग पेशींच्या कामाला धरबंध राहत नाही आणि म्हणून कॅन्सर होतो. यावर अधिक संशोधन झालं आणि पेशीतल्या मूळ मानवी वृद्धिजनुकांवर वचक ठेवणारी, p53 किंवा pRb सारखी वृद्धिरोधक जनुकं शास्त्रज्ञांच्या ओळखीची झाली.

उरफाट्या विषाणूंच्या अख्ख्या जनुकसंचयाची कॉपी मानवी जनुकसंचयात घुसते आणि तिथे कायमचं ठाण मांडते. पण मानवी वृद्धिजनुकांशी गट्टी करणं तिला दर वेळी जमतंच असं नाही. तशी संधी तिला जेव्हा मिळते तेव्हाच त्या मानवी पेशीत कर्कबाधा सुरू होते. त्यामुळे हे परिवर्तन अधिक सावकाश होतं.

कधीकधी मानवी वृद्धिजनुकाची त्या विषाणूशी अशी गट्टी जमते, की ते जनुक त्या विषाणूचा हात धरून पळून जातं आणि दुसऱ्याच प्रकारच्या पेशींमध्ये पोचतं. तिथे त्याच्यावर वचक ठेवणारी, त्याच्या मूळ पेशीतली खास रक्षक-जनुकं नसतात. मग काय? त्या जनुकाची चेटकीण बनते, झपाटून कामाला लागते, त्या नव्या पेशीची बेफाम वाढ होते आणि अति-वृद्धीनं त्या पेशीचं कर्कपेशीत परिवर्तन होतं.

काही विषाणूंचे नुसते प्रथिन-संदेश वृद्धिजनुकांचं पाऊल वाकडं पाडायला कारण ठरतात. शास्त्रज्ञांची अशीही अटकळ आहे, की काही विषाणू एकाक्षरी जनुक-चुकांचा फक्त पायंडा पाडून देतात. मग तो विषाणू पेशीपासून दूर निघून गेला तरीदेखील ती पेशी बापडी तोच कित्ता गिरवत, चुकांचा घडा भरत राहते.

कित्येक विषाणू त्यांच्या पुनरुत्पादना-साठी कर्कपेशींवरच अवलंबून असतात. त्या पेशी मरणं, त्यांनी आत्महत्या करणं त्या विषाणूंच्या फायद्याचं नसतं. म्हणून जी जनुकं पेशींची आत्महत्या घडवून आणू शकतात अशा वृद्धिरोधक जनुकांमध्ये ते विषाणू फेरफार घडवून आणतात. त्यांना कुचकामी करून टाकतात. त्याशिवाय त्या विषाणूंजवळ अमरत्वाचा मंत्र, म्हणजे viral telomerase हे एन्झाइम-प्रथिन असतं. हा मंत्र ते आपल्या आश्रयदात्या पेशींना देतात. तो वापरला की पेशींच्या रंगसूत्रांच्या शेपट्यांची लांबी सतत वाढतच राहते. त्यामुळे त्या पेशी अगणित वेळा विभाजित होऊ शकतात, अमर होतात आणि अव्याहतपणे विषाणूंना पोसत राहतात.

या पेशी खरोखरच अमर असतात का?

हेलेन लॅक्स नावाची एक बाई होती. तिला चामखिळींच्या विषाणूमुळे (Human Papilloma Virus) गर्भाशयाच्या तोंडाचा कॅन्सर झाला होता. एकावन्न सालच्या फेब्रुवारीत, म्हणजे, आजपासून बरोबर एकसष्ट वर्षांपूर्वी योग्य वैद्यक-चिकित्सा करण्यासाठी त्या कर्क-व्याधीचा एक तुकडा डॉक्टरांनी कापून घेतला. कॅन्सरच्या त्या पेशींना विषाणूंनी telomeraseचा अमरपट्टा दिला होता. हेलेन लॅक्सबाई एकावन्न सालीच, वयाच्या एकतिसाव्या वर्षी वारली, पण तिच्या शरीरात निर्माण झालेल्या या HeLa पेशींचं प्रयोगशाळेत त्यावेळी लावलेलं विरजण अजूनही जिवंत आहे. जगभरातल्या अनेक वेगवेगळ्या प्रयोगशाळांनी त्या विरजणाची कवडी मागून घेतली आहे. कॅन्सर आणि एड्सच्या संशोधनासाठी, घातक किरणांचे आणि रसायनांचे जनुकांवरचे परिणाम अभ्यासण्यासाठी, जनुकसंचयाचा नकाशा तयार करण्यासाठी, एक ना दोन, अनेक प्रकारच्या प्रयोगांसाठी त्या विरजणाचा वापर झाला आहे. पोलिओची, काविळीची लस तयार करायला या पेशींचा उपयोग झाला. त्या अंतराळात पाठवल्या गेल्या. अण्वस्त्रांच्या स्फोटांत भाजून काढल्या गेल्या. त्या पेशींवर लिहिल्या गेलेल्या शोध-निबंधांची संख्या तीन वर्षांपूर्वीच साठ हजार होती. दर महिन्याला त्यांत तीनशे निबंधांची भर पडते आहे.

कर्करोग फक्त विषाणूंच्याच संसर्गानं होतो असं नाही. तो इतरही जंतूंमुळे होऊ शकतो.

जठरातल्या अल्सरचं प्रमाण वाढवणारा Helicobacter pylori नावाचा

जीवाणू जठराच्या पेशींमध्ये 'ध'चा 'मा' करण्यासारख्या अनेक एकाक्षरी जनुक-चुका घडवतो. त्याशिवाय तो जठरपेशींमध्ये दाह निर्माण करतो. दाह वाढवणारी प्रथिनं त्या जनुक-चुका फैलावायला मदत करतात. यकृतातले, मूत्रपिंडातले काही जंतही असे दाह वाढवून जनुक-चुकांचे उकिरडे माजवतात.

आनुवंशिकता आणि विषाणू-जीवाणूंचे संसर्ग हे तर झालेच, शिवाय दाही दिशा भरून राहणारा सूर्यप्रकाश आणि पर्यावरणातली, दर श्वासावाटे फुप्फुसांत घुसणारी प्रदूषणं ही देखील कर्करोगाला झुकतं माप देतात.

सूर्यकिरण, विशेषतः त्यांतले अतिनील किरण त्वचेच्या पेशीकेंद्रांमध्ये आपले हात खुपसतात. एखाद्या लहान मुलानं सहज कुतूहलानं खेळणं हाताळावं, मोडावं, तोडावं आणि मग मनाला वाटेल तसं जोडावं, तसेच हे प्रकाशाचे हात पेशीकेंद्रातल्या DNAची मोड-तोड-फोड करतात आणि मग त्या DNA-ठिकऱ्या उलट्या-सुलट्या कशाही जुळवून ठेवतात. त्या उपद्व्यापात अधला-मधला महत्त्वाचा मजकूर गळतो, नवी निरर्थक किंवा अगदी अनर्थकारी विधानं नोंदली जातात. अशा नवजडित विधानांतून त्यानंतर मिळणारे संदेश पेशींमध्ये भलताच गोंधळ घालतात. कर्करोगाचा दहशतवाद माजतो.

अणुस्फोटातून उत्सर्जित झालेले किरण, वैद्यकीय चाचण्यांसाठी वापरले जाणारे क्ष-किरण यांचे शक्तिमान भाले शरीरात अधिक खोलवर घुसतात. रक्तपेशींना जन्म देणाऱ्या मायपेशी हाडांच्या कडेकोट तटबंदीत जपलेल्या असतात. घातक किरणांचे विध्वंसक भाले तिथवर पोचून त्या मायपेशींच्या DNAमध्ये हाहाकार माजवतात. अनेक प्रकारचे रक्ताचे कॅन्सर बळावतात. CT scan ही क्ष-किरणांनी केली जाणारी आधुनिक तपासणी कित्येक अचूक निदानं करायला उपयुक्त आहे, उपकारक आहे, पण ती तपासणी करताना क्ष-किरणांचा मोठ्या प्रमाणात मारा होतो. याचं भान सतत बाळगलं नाही, तर पुढील काही दशकांतच तेच मानवी कर्करोगाचं प्रमुख कारण बनू शकेल!

'नैनं दहति पावकः न चैनं क्लेदयंत्यापो' हे वर्णन ॲसबेसटॉस या खनिजाला तंतोतंत लागू पडतं. ते जसं आगीत जळत नाही, पाण्यात भिजत नाही तसंच ते विजेचा प्रवाह देखील रोधून धरतं, वाहून नेत नाही. जळत नसल्यामुळे ते उच्च तापमानापर्यंत तापतं आणि सहज निवत नाही. त्याचे ताठ पत्रे बनतात तशीच त्याची लवचीक वस्त्रंही बनवता येतात. ग्रीक अग्निहोत्र्यांनी ते न जळणारी शाश्वत वात म्हणून वापरलं. अग्नीनं शुद्ध होऊन अधिकच उजळणारे त्याचे कपडे राजेमहाराजांनी अंगावर मिरवले. अंत्यसंस्कारांतही तेच कपडे घातले की मग त्या न जळलेल्या कपड्यांतून पूर्ण देहाची रक्षा अलगद काढून घेता येई.

एकोणिसाव्या शतकात, औद्योगिक क्रांतीनंतर उष्णतारोधक, वीजरोधक म्हणून ॲसबेसटॉसचा वापर झपाट्यानं वाढला. कारखान्यांत, कार्यशाळांत, आगबोटींत आणि घराघरातही त्याची प्रतिष्ठापना सन्मानानं झाली. एकोणीससे पन्नास ते ऐंशीमधल्या तीन दशकांवर त्याने अधिसत्ता गाजवली. परंतु याच काळात या बहुगुणी पदार्थाची लांब शिंगं मात्र प्रकर्षानं टोचायला लागली. मिसोथीलियोमा हा फुप्फुसांच्या आणि उदरपोकळीच्या आवरणांचा कॅन्सर ॲसबेसटॉसमुळे होतो हे याच काळात सिद्ध झालं. हा कॅन्सर सरसकट सगळ्यांना होत नाही. त्यासाठी मुळात कर्करोगाकडे जनुकीय कल असावा लागतो.

जेव्हा ॲसबेसटॉसचे सूक्ष्म तंतू पेशीकेंद्रामध्ये घुसतात तेव्हा ते रंगसूत्रांमध्ये गुंततात. त्यांच्या फटकाऱ्यांनी काही रंगसूत्रांचे तुकडे निखळतात, काही जनुकांमधले शब्द गळतात, अनेक लहान-सहान जनुक-चुका गोळा होतात. जर आधीपासूनच त्या पेशीचा कॅन्सरकडे कल असेल तर या चुकांनी ती प्रवृत्ती वाढते आणि कर्करोग उद्‌भवतो.

बऱ्याच माणसांच्या जीवनात मद्याचा पहिला प्याला आणि सिगारेटचा पहिला झुरका भविष्यातल्या कॅन्सरची नांदीच ठरतात.

मद्यपानामुळे जनुकांमध्ये वाक्यांच्या, शब्दांच्या चुका होत नाहीत. जनुकाक्षरांमध्ये मिथाइल, ॲसेटाइल वगैरे रासायनिक काने-मात्रा-वेलांट्या असतात. मिथाइलची मात्रा जनुकाला चिकटली की त्याचं काम थांबतं. अल्कोहोलमुळे या असल्या मिथाइल-मात्रा काढून टाकल्या जातात. एरवी मुद्दामहून ठप्प ठेवलेली कित्येक हानिकारक जनुकं उत्साहानं कामाला लागतात. शिवाय, अल्कोहोल cytochrome P या मुकादम-प्रथिनाच्या दादा जनुकाला पराणी टोचून उठवतं आणि पेशीची वाढ-विभाजन करायला भाग पाडतं. या अती कामामुळे नको ते रासायनिक पदार्थ बनतात आणि त्यांची DNA वर पुटं जमतात. अशा DNAचं विभाजन नीट होऊ शकत नाही. अल्कोहोलमुळे शरीराची कर्क-प्रतिबंधक शक्तीही कमी झालेली असते. या साऱ्याचा परिपाक म्हणून कॅन्सर होऊ शकतो.

तंबाखूच्या धुरात तर डझनावारी कर्क-जनक पदार्थ असतात. पेशीची कर्क-प्रतिबंधक योजना त्यांच्याशी चार हात करते. पण त्या धुमश्चक्रीमुळे ती वेड्यासारखी काम करायला लागते. अती काम केलं की पेशीत घातक रसायनं जमतात, त्यांच्यामुळे DNAच्या विभाजनात अनेक चुका होतात. अशा चुका जर वृद्धिजनुकांमध्ये किंवा वृद्धिरोधकांमध्ये झाल्या तर पेशींची वाढ आणि विभाजन अनियमित होऊन, वेडेवाकडे फरफटतात. कर्करोगाचा शिरकाव होतो. मद्य आणि तंबाखू ही दोन्ही व्यसनं माणसाला असली तर ती एकजुटीनं कर्करोगाचं स्वागत करतात.

तीस वर्षांपूर्वीपर्यंत कर्करोगाच्या अशा विविध कारणांचे अभ्यास वेगवेगळ्या प्रयोगशाळांत चालू होते. विषाणू, प्रदूषणं, घातक किरण वगैरे प्रत्येक दुष्ट प्रवृत्तीचा कर्करोपणाचा मार्ग वेगळाच असेल असं

शास्त्रज्ञांनी गृहीत धरलेलं होतं. पण एका जनुकसंचयातला DNA दुसऱ्या पेशीकेंद्रात रुजवणं सुमारे तीस वर्षांपूर्वी जमलं. आणि त्या अनुषंगाने हे कळलं, की बहुतेक कर्कगाठींमध्ये वृद्धिरोधक जनुकांची मुस्कटदाबी झालेली असते. पन्नास टक्क्यांहून अधिक कॅन्सरमध्ये, p53 या वृद्धिरोधकात हानिकारक बदल झालेले असतात. वारसा, विषाणू, प्रदूषणं, प्रखर किरण सारे एकाच कर्कवाटेवरून, एकमेकांना हात देत चालतात. हे समजल्यावर या वेगवेगळ्या दुष्ट संगतींनी बिघडणारी जनुकं एकसारखीच असल्याचा, 'एकः सो बहुस्युः' हा साक्षात्कार संशोधकांना झाला. या साक्षात्कारामुळे अनेक ठिकाणी चाललेल्या, विखुरलेल्या संशोधनांत एकवाक्यता आली. त्यातून चिकित्सेचे, उपचारांचे नवे लक्ष्यवेधी मार्ग सापडले.

चुका झाल्यामुळे पालटलेल्या जनुकांचे निरर्थक किंवा अनर्थकारी संदेश विकृत प्रथिनांच्या रूपात दिले जातात. अशी प्रथिनं त्या कर्कपेशींतून रक्तात, मलात वगैरे सांडतात. ती रासायनिक चिकित्सांनी हुडकता येतात. प्रोस्टेटच्या, आतड्याच्या, इत्यादी विवक्षित कर्करोगांचं निदान या पद्धतीनं करता येतं.

सध्या कर्करोगावर जे अत्याधुनिक इलाज केले जातात, त्यांच्यात कर्कपेशीं-मधल्या या विकृत प्रथिनांचाच वेध घेतला जातो. या संदेश-प्रथिनांवरचा नेमका उतारा बनवायला मानवी कर्कग्रंथींशी इतर प्राण्यांच्या पेशींचा संकर करून तयार होणारे hybridoma वापरले जातात. काट्यानं काटा काढायची ही अभिनव जीवशास्त्रीय पद्धत म्हणा ना! प्रयोगशाळेत बाटल्यांत जोपासल्या जाणाऱ्या ह्या संकरित कर्कग्रंथींना नवी प्रथिनं बनवायचं शिक्षण दिलेलं असतं. ही नवी प्रथिनं म्हणजे विकृत संदेश-प्रथिनांची प्रति-प्रथिनं (monoclonal antibodies) असतात. ती विकृत कर्कजन्य संदेश-प्रथिनांना ओळखून त्यांच्यावर पकड बसवतात आणि त्यांचा नायनाट करतात. त्यामुळे घातक संदेश थांबतात. पेशीच्या कामकाजातला गोंधळ शमतो.

Cetuximab, Panitumumab यांसारखी प्रति-प्रथिनं आतड्याच्या कॅन्सरच्या वृद्धिजनुकांचे प्रथिन-संदेश स्वीकारणारे प्रथिन-चपराशी (receptors) निकामी करून अनावर झालेली वाढ थांबवतात. HER2 हे जनुक स्तनाच्या कर्कपेशींत अधिक प्रमाणात असतं. त्याच्या जादा कामामुळे पेशींची नको तितकी वाढ होते. त्याचा संदेश घेणारा प्रथिन-चपराशी निकालात काढायचं काम Trastuzumab किंवा Herceptin हे प्रति-प्रथिन करतं. अशी अनेक प्रति-प्रथिनं सध्या वेगवेगळ्या कॅन्सरच्या उपचारासाठी वापरली जातात. अशा प्रति-प्रथिनांच्या शेपटाला कर्कनाशक औषधांचे परमाणू किंवा किरणोत्सारी द्रव्यं बांधली, की ती जोडगोळी अधिकच प्रभावी उपचार साधते.

शिवाय विकृत जनुकांची किंवा त्यांच्या प्रथिन-संदेशांची प्रति-प्रथिनं Western Blotसारख्या चिकित्सा-तंत्रात वापरून कर्करोगाचं अचूक निदानही करता येतं.

जनुकलक्ष्यी उपचारांवरचं संशोधन अजून प्रायोगिक अवस्थेत आहे. कर्कग्रंथीतले जनुकीय दोष अभ्यासून नेमक्या त्या दोषांवर जनुकीयच इलाज योजणं हे या संशोधनाचं ध्येय आहे. पूर्वी बादशहाच्या जनानखान्यात राण्यांची सेवा करायला तृतीयपंथी चाकर ठेवले जात. ते विश्वासू आणि निरुपद्रवी असत. पेशींच्या अंतःपुरातले, म्हणजेच जनुक-संचयातले दोष निस्तरायला अशाच प्रकारचे विश्वासू आणि निरुपद्रवी सेवक योजायचा शास्त्रज्ञांचा बेत आहे. त्यांचे असे नोकर म्हणजे उरफाटे विषाणू. या विषाणूंची पुनरुत्पादनाची आणि रोग उत्पन्न करायची शक्ती जनुकपालटानं खच्ची केलेली असेल. शिवाय नेमक्या कर्कपेशी ओळखण्यासाठी आणि त्या पेशींत योग्य स्थानी पोचण्यासाठी त्यांना खास जनुकीय शिक्षण दिलेलं असेल.

अशा प्रकारे कर्कपेशींतल्या बेताल वृद्धिजनुकांना निकामी करणारे oncolytic (कर्क-विनाशक) विषाणू पेशींत घुसवता येतील. जनुकदोषांमुळे कुचकामी झालेल्या किंवा नष्ट झालेल्या p53 सारख्या महत्त्वाच्या जनुकांचे सक्षम बदली कामगार, खच्ची विषाणूंचा हात धरून कर्कपेशींत पोचवता येतील. शिवाय कर्कपेशींमध्ये आत्मघातकी जनुकांचं रोपण करणं जमेल. ही आत्मघातकी जनुकं काही औषधांच्या निरुपद्रवी आणि निर्गुण पूर्वरूपाचं प्रभावी औषधांत रूपांतर करतील. त्यामुळे भोवतालच्या सर्वसामान्य पेशींवर त्या औषधाचा कसलाही दुष्परिणाम न होता नेमक्या कर्कपेशींचाच नायनाट होईल.

सध्या आपल्या युवराज सिंगला या कर्कराहूनं ग्रासलं आहे. पण राहूमुळे लागलेलं ग्रहण सुटल्यानंतर सूर्य-चंद्र अधिक तेजानं झळाळून उठतात. पत्रिकेत लागलेली राहूची पीडा संपली की भविष्य अधिक उज्ज्वल होतं म्हणतात. ही केवळ वदंता नाही. लान्स आर्मस्ट्राँग या अमेरिकन दुचाकीवीरानं हे सत्यात आणून दाखवलं आहे.

एक्याण्णव सालापासून सातत्यानं पाच वर्षं लान्सनं दुचाकी-स्पर्धांमध्ये जगज्जेतेपद पटकावलं. त्यानंतर त्याची प्रकृती खालावली. पंचाण्णव सालची स्पर्धा जेमतेम पुरी करणंही त्याला अवघड झालं. या अपयशाचं कारण शोधायला तपासण्या झाल्या. त्यांत त्याला वृषणाचा दुर्धर कॅन्सर असून तो त्याच्या फुप्फुसांत आणि मज्जासंस्थेत पसरला असल्याचं निदान झालं. त्या आजारातून तो जगण्याची शक्यता चाळीस टक्क्यांहून कमी होती. त्यावेळी आर्मस्ट्राँग अवघा पंचवीस वर्षांचा होता. पण त्यानं हार मानली नाही. त्याने आणि त्याच्या डॉक्टरांनी आजाराशी शर्थीची झुंज दिली. आर्मस्ट्राँग जिद्दीनं मृत्यूच्या दारातून परतला आणि तीनच वर्षांत पुन्हा दुकाचीवरून रपेट मारायला लागला. इतकंच नव्हे, तर नव्याण्णव सालापासून पुढची सलग सहा वर्षं तो जागतिक दुचाकीस्पर्धा अव्वल क्रमांकानं जिंकला. कित्येक जागतिक उच्चांक प्रस्थापित करून, फ्रान्सभराची दुचाकी-दौड सातव्यांदा

जिंकल्यावर त्यानं स्वेच्छेनं निवृत्ती जाहीर केली. त्या काळात आतासारखे कर्करोगावरचे नेमके, लक्ष्यवेधी उपचार अस्तित्वात नव्हते. त्यावेळच्या इलाजांनी व्याधीसोबत शरीराच्या इतर भागांनाही बरीच हानी पोचत असे. तरीदेखील ती झुंज आर्मस्ट्राँगनं जिंकली.

आपल्या युवराजलाही अगदी तोच, लान्ससारखाच वृषणाचा कॅन्सर झाला आहे. आता या कॅन्सरची शरीरात विखुरलेली बीजं हुडकायला प्रति-प्रथिनांचा वापर करता येतो. आजार बरा होण्याची शक्यता जवळजवळ नव्वद टक्क्यांवर पोचली आहे. त्या बळावर युवराज आयुष्याची शतकी धाव पुरी करण्याची शक्यता दांडगी आहे.


ज्ञान दिसामासानं वाढतं आहे. नवं संशोधन त्या व्यासंगाच्या पायावर आधारलेलं आहे. ते अधिकाधिक नेमक्या आणि बिनचूक चिकित्सापद्धती, अधिकाधिक प्रभावी आणि लक्ष्यवेधी उपचार मानवाच्या दिमतीला आणून देतं आहे. संगणकाच्या आणि आंतरजालाच्या कृपेनं अत्याधुनिक ज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचतं आहे. त्यातून प्रकृतीसाठी वेचक धडे घेणं आणि कर्करोगाची अनेक कारणं सावधपणे टाळणं आता शक्य आहे.

नव्या, सर्वव्यापी ज्ञानाचा फायदा जागरूकपणे पदरात पाडून घेतला तर माणसाच्या प्रकृतिस्वास्थ्याला लागलेलं हे कर्क-राहूचं ग्रहण सुटल्यात जमा होईल. मग अधिक निकोप आणि तेजस्वी मानवजात, या पृथ्वीच्या पुन्हा स्वच्छ झालेल्या वातावरणात अनेक सहस्रकं आनंदानं कालक्रमणा करील.

**डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

**'ग्रेगोर मेंडेलच्या वाटाण्यांतून एक नवंच शास्त्र, जनुकशास्त्र अकुंरलं. त्या वाटाण्याचा वेलू आता गगनावरी गेला आहे. त्याचे धुमारे वेगवेगळ्या दिशांना फैलावले आहेत. मानवाच्या अस्तित्वाचा कोनाकोपरा त्यांनी व्यापला आहे. या वेलाची पाळं-मुळं तर पार आदि-जीवाला जाऊन भिडली आहेत. या शास्त्राच्या बुलंदी-गहिराईच्या विस्तारात मानव नुकता कुठे डोकावतो आहे. पण नावाच्या नैसर्गिक चमत्काराच्या दिव्यत्वाची प्रचीती यायला, निसर्ग-माउलीबद्दल मनात कृतज्ञता दाटून यायला ज्ञानाची तेवढी झलकही पुरेशी आहे. गेल्या वर्षभरात आपण अशा या बहुआयामी, सर्वव्यापी शास्त्राची तोंडओळख करून घेतली. एप्रिलच्या अंकातल्या लेखाने या मालिकेचा समारोप होईल.'**

## **ग्रंथालीचे** १२ मार्चला प्रसिद्ध होणारे पुस्तक




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

### **यशवंतराव चव्हाण :** माणूस आणि लेखक
### **डॉ. प्रकाश दुकळे**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, कृषि-औद्योगिक क्रांतीचे प्रणेते, उत्तम संघटक आणि प्रशासक, कुशल राजकारणी, धुरंधर नेता, मर्मज्ञ रसिक, वक्तृत्वपटू अशा विविध पैलूंनी समृद्ध असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून यशवंतराव चव्हाण यांना ओळखले जाते.

विविध क्षेत्रांतील नामवंतांनी यशवंतरावांच्या 'राजकीय' व्यक्तिमत्त्वाचा सातत्याने वेध घेतलेला आहे. मात्र, 'यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक' या ग्रंथात, डॉ. प्रकाश दुकळे यांनी, यशवंतरावांच्या अभिरुचीसंपन्न सर्जकतेचा धांडोळा घेताना, त्यांच्या उपलब्ध वाङ्मयकृती आणि प्रकाशित-अप्रकाशित पत्रसंग्रह यांच्या आधारे यशवंतरावांची बहुश्रुत रसिकता, सर्जनशीलता आणि एकूणच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परामर्श घेतला आहे.

यशवंतरावांमधील कर्तव्यकठोर तरी हळव्या 'माणूस'पणाच्या हृद्य पैलूवरही डॉ. दुकळे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. एकूणच यशवंतरावांच्या अष्टावधानी व्यक्तिमत्त्वाची जाणीव हा ग्रंथ वाचताना होईल...

# बी. एच. मर्लापल्ले

## प्रवीण बर्दापूरकर

मे १९९८ मधली घटना. नुकतीच औरंगाबादला बदली झालेली होती. जवळजवळ वीस-एकवीस वर्षांनी औरंगाबादला परतल्यानं जुन्या ओळखींना उजाळा आणि नव्या भेटीगाठी सुरू होत्या. न्या. नरेंद्र चपळगावकर यांना भेटायला गेलो, त्यांना सर्वजण नाना म्हणतात. त्यांच्याकडे ओळख झाली, न्या. बी. एच. मर्लापल्ले आणि ज्येष्ठ वकील प्रवीण शहा यांची. मर्लापल्ले यांनी काही मला ओळखलं नाही, तसंही त्यांनी ओळखणं शक्य नव्हतं; कारण पुलाखालून खूप पाणी वाहून गेलेलं होतं.

पुन्हा सत्तरीच्या दशकातले दिवस आठवले. आज वाटतं तितकं त्या काळात शिक्षण सहज आणि सोपं नव्हतं. पंचक्रोशीत एखादं हायस्कूल असलं तर चैन असायची. मॅट्रिक सोडाच, सातवी बोर्डाची परीक्षा द्यायलाही अनेकदा तालुक्याच्या गावी जावं लागायचं.२ मॅट्रिकची तर सोय फक्त तालुक्याच्या गावीच असायची. गावातली एकदम दहा-वीस मुलं परीक्षेला जायची आणि तालुक्याच्या गावी कुठंतरी ओळखी-पाळखीनं राहायची, अनेकदा तर शाळेच्या व्हरांड्यातच मुक्काम करत. गावातून दररोज कुणी तरी या मुलांची शिदोरी घेऊन येत असे. सगळी मुलं एकत्र राहत, खात; जातीपातीचा अडसर कधीच निर्माण होत नसे. केवळ शिक्षणाच्या सोईबाबतीतच नव्हे, तर एकूणच अशी प्रतिकूल परिस्थिती सार्वत्रिक होती. मोठ्या गावी असलेल्या शाळेत जाण्यासाठी रस्ते नव्हते,रस्ते नसल्याने बस नसे. दररोज पाणंदीतून (पाणंद म्हणजे दोन शेताच्या मधून



बी. एच. मर्लापल्ले

जाणारी रस्तावजा खोलगट वाट) पायपीट करावी लागे. पावसाळ्यात पाणंद वाहती असे तर हिवाळ्यात गारेगार. इतकी गार, की हाताची बोटं सरळ होत नसत. उन्हाळ्यात धुळीच्या खकाण्यानं जीव हैराण होत असे. घरी आल्यावर अंगातला सदरा काढून झटकला तर धुळीचे लोट उडत. पायात चप्पल नसे, चप्पल तेव्हा परवडतच नसे. बहुसंख्य मुलं एनसीसीत जात, कारण बूट आणि एक खाकी ड्रेस मिळे. ओठ भेगाळत रक्तबंबाळ करणाऱ्या थंडीत, त्या जडशीळ बुटांचा पायांना मोठा आधार वाटे. शिवाय परेडच्या दिवशी चार आणे भत्ता मिळे, दर तीन-चार महिन्यांनी मिळणाऱ्या या भत्त्याचे मोठे आकर्षण असे. त्या काळात नवीन सायकल दोनशे-सव्वादोनशे रुपयांना मिळे. पाटील किंवा गावातल्या एखाद्या मालगुजार आसामीलाच स्वत:ची सायकल परवडे. सायकली भाड्यानं मिळत, पण तासाला असलेले चार-पाच आणे भाडे परवडत नसे. वर्ष-सहा महिन्यांतून पाच-पंचवीस किलोमीटरवर असलेल्या पाहुण्याकडे जायचे तर रोजी दोन रुपये दराने सायकल मिळे. पण, रात्रभर त्या सायकलचा वापर आपण करू शकलो नाही अशी अपराधी भावना मनात कायम असे. ग्रामीण भागातून येणारी मुले तर पायजमा आणि सदरा घालूनच महाविद्यालयातही येत.

वार्षिक परीक्षा जवळ आली, की फी कशी भरावी या भीतीने पोटात गोळा उठत असे. ग्रामीण आणि निमशहरी असलेल्या गावातील मर्लापल्ले यांच्यासह आमच्या पिढीतल्या अनेकांचं शिक्षण असंच झालं. एस. एस्सी. झाल्याच्याच वर्षी नेमकं नारायण नागदकर-पाटील यांच्या पुढाकारानं कन्नडला कला आणि वाणिज्य महाविद्यालय सुरू झालं, इबीसी (म्हणजे आर्थिक मागास असण्याची) सवलत मिळाली. कन्नड तालुक्यात आम्हा अनेकांना महाविद्यालयीन शिक्षणाची कवाडे उघडली गेली. शिक्षणाबाबतची अशीच परिस्थिती मराठवाड्यात बहुतेक सर्व ठिकाणी होती. शिक्षणाची आस असणारे मोठे कष्ट करत, दररोज अनेकजण तर चार-पाच मैल जाणे आणि चार-पाच मैल परत येणे असा प्रवास दररोज शाळेसाठी करत. (पाच मैल म्हणजे आठ किलोमीटर असे ते प्रमाण!) मर्लापल्ले यांच्यासह मराठवाड्यातले अनेकजण अशी पायपीट करत महाविद्यालयापर्यंत पोहोचले होते. त्यांच्यानंतरच्या पिढीसाठी सर्वांसाठी शिक्षण आणि शिक्षणाचे सुलभीकरण या योजना आलेल्या होत्या. महाविद्यालयीन

शिक्षणाचे दरवाजे ठोठावणाऱ्या पिढीत आम्ही सगळे होतो, वयाने कमी-अधिक होतो. प्रमोद महाजन,गोपीनाथ मुंडे, डॉ. भालचंद्र कांगो, विजय गव्हाणे, सुभाष लोमटे, प्रवीण वाघ, नागेश केसरी अशी एक ना अनेक नावे त्यात होती. सर्व तरुण होते, वेगवेगळ्या वयोगटांतील आणि परस्परभिन्न राजकीय विचारांचे आणि त्या विचाराने भारलेले होतो आणि तरीही विद्यार्थी चळवळीच्या निमित्ताने, मराठवाड्याचा विकास व्हावा या तळमळीने, मराठवाडा कृती समिती नावाच्या झेंड्याखाली हे सर्वजण एकत्र होते. तत्कालीन काँग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट,जनसंघ अशा विविध राजकीय विचारांचा पगडा या सर्वांवर होता. अनंत भालेराव, कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी, बापूसाहेब काळदाते, नरहर कुरुंदकर, ना. य. डोळे, प्रल्हाद अभ्यंकर, वा. ल. कुळकर्णी, अशी वेगवेगळी पीठे त्याकाळी मराठवाड्यात सर्वदूर पसरलेली होती. आपापल्या पीठाचार्यांचे म्हणणे भक्तिभावाने श्रवण करणे आणि त्याहीपेक्षा दुप्पट भक्तिभावाने त्यांच्या म्हणण्याचा प्रचार करणे हा त्या काळातल्या तरुण पिढीचा छंद होता. याशिवाय नेहरू युवक केंद्र आणि औरंगाबाद यूथ सेंटर ही अनुक्रमे केंद्र आणि राज्य सरकार पुरस्कृत दोन केंद्रे होती. (मी जरी अनंत भालेराव पीठाचा होतो तरी यूथ सेंटर हा माझा अड्डा होता; कारण तेथे मी अर्धवेळ तथाकथित ग्रंथपाल होतो. मेहनताना फारच कमी होता पण त्यात मेसचे पैसे सुटत! अन्नाची भ्रांत सुटत असल्याने यूथ सेंटरचा धागा मी पक्का पकडून ठेवला होता.) विद्यापीठ पातळीवर आम्हाला ज्येष्ठ असणाऱ्यांत तेव्हा मर्लापल्ले होते. बापूसाहेब काळदाते पीठाचे स्कॉलर म्हणून ते ओळखले जात. याच काळात संवेदनशीलता, टोकाची सचोटी, माणुसकीवर श्रद्धा हे संस्कार त्यांच्यावर झाले आणि ते त्यांनी व्रतासारखे कायम जपले. बहुधा आडनाव कठीण असण्याने की काय, मित्र वर्तुळात ते बाबुराव या नावाने परिचित झालेले होते. त्याकाळचे एक पक्के स्मरण म्हणजे; तेव्हा विद्यापीठाचे कुलगुरू आर. पी. नाथ होते. आम्ही बहुसंख्य 'नाथ हटाओ' बाजूचे होतो तर 'नाथ बचाव' बाजूचे मर्लापल्ले एक कट्टर समर्थक होते.

मर्लापल्ले उदगीर तालुक्यातल्या गुद्सुर गावचे. मराठवाड्याच्या मुक्तिलढ्यात या गावाचे योगदान मोठे. क्रांतिकारकांचे गाव म्हणून ते ओळखले जायचे. क्रांतिकारक नाना पाटील यांनी एकदा नव्हे, तर दोन वेळा गुद्सुरला भेट दिल्याचा गौरवशाली इतिहास आहे. या थोर क्रांतिकारकाला आपल्या घरात पिठलं-भाकरीचं जेवण वाढल्याची शाळकरी न्या. मर्लापल्ले यांची आठवण, आजही हिरवीकंच आहे. गुद्सुर या गावावर कम्युनिस्टांचा मोठा प्रभाव तेव्हा होता. हा कम्युनिस्ट विचाराचा प्रभाव सुरुवातीला मर्लापल्ले यांच्यावरही होता. कम्युनिस्टांचे केंद्रच मर्लापल्ले यांच्या घरात होते. मर्लापल्ले यांनी पहिले वृत्तपत्र वाचले तेही कम्युनिस्टांचे साप्ताहिक युगांतर! गावावरचा आणि मर्लापल्ले यांच्याहीवरचा तो कम्युनिस्ट विचाराचा प्रभाव, बापूसाहेब काळदाते यांनी मोडून काढला. वर वर्णन केलेल्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मर्लापल्ले यांनी याच गावात प्राथमिक शिक्षण घेतले. नंतर वाढोणा या गावी हायस्कूल; त्यासाठी दररोज दोन कोसांची पायपीट. महाविद्यालयीन शिक्षण नांदेडला आणि औरंगाबादला देवगिरी महाविद्यालयात. बी. एस्सी. ऑनर्सनंतर औरंगाबादला. १९७५मध्ये मित्रांच्या आग्रहाखातर त्यांनी एल. एल. बी. ला प्रवेश घेतला तो थेट मराठवाडा विद्यापीठात, ते वर्ष होते १९७०. वकिलीची प्रारंभीची त्यांची काही वर्षे व्यवस्थापनाचा वकील अशी होती, ब्रुक बॉन्ड, टेल्को अशा ठिकाणी काम केल्याने त्यांची ही अशी ओळख काही काळ होती. नंतर त्यांनी स्वतंत्र वकिली सुरू केली. देशाच्या पंतप्रधानपदी देवेगौडा असताना त्यांचा एक कार्यक्रम कव्हर करायला मी आणि दिलीप चावरे लातूरला गेलेलो असताना, आम्हाला लातूर जिल्ह्यातील कोणीतरी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाल्याचं कळलं, चौकशी केली तर कळलं ते मर्लापल्ले होते! न्यायमूर्ती नानासाहेब चपळगावकर यांच्याकडे भेट झाल्यावर, मर्लापल्ले यांच्याशी असलेले हे सगळे संदर्भ आठवले. हे आठवणं एकतर्फी होतं; कारण मर्लापाल्ले यांना ते काहीच आठवणं शक्य नव्हतं. कारण, एक तर ते आम्हाला तेव्हा सीनियर होते आणि आमची पुन्हा भेट होण्यात पंचवीस वर्षं उलटली होती. नागपुरात असताना मी हायकोर्ट बीट केलेलं होतं, मग मी औरंगाबादला हायकोर्ट कव्हर करायला सुरुवात केली आणि मर्लापल्ले यांच्याशी मैत्र पुन्हा जुळलं.

हायकोर्ट जज्ज म्हणून मर्लापल्ले यांची कारकीर्द मला आधी एक रिपोर्टर म्हणून आणि मग संपादक म्हणून बघता आली. आपल्या देशाच्या घटनेला जे काही अभिप्रेत आहे ते देण्यापासून मार्लापल्ले न्यायमूर्ती म्हणून कुठेही ढळले नाहीत; म्हणूनच एक कर्तव्यकठोर आणि तत्त्वनिष्ठ न्यायाधीश अशी ख्याती १४ वर्षांत त्यांनी प्राप्त केली, यात मला तरी आश्चर्य वाटलं नाही. कारण आमच्या पिढीतला जो कोणी सत्तरीच्या त्या दशकात ज्या कोणत्या ना कोणत्या पीठाची दीक्षा घेऊन बाहेर पडला, तो पथभ्रष्ट झाला नाही इतका त्या पीठाचा संस्कार निर्मल आणि प्रबळ होता. त्यामुळेच अजित गोगटे याने, मर्लापल्ले न्यायमूर्ती म्हणून निवृत्त झाल्यावर त्यांनी न घेतलेल्या रजा, त्यांची कर्तव्यकठोर न्यायनिष्ठा वगैरेबद्दल भरभरून लिहिलं त्याचं आश्चर्य वाटलं नाही. नोकरीच्या शेवटच्या दिवशी त्यांनी सरकारी निवासस्थान सोडलं याचं कौतुक वाटलं नाही. मर्लापल्ले तसं वागले नसते तर मात्र आश्चर्य वाटलं असतं, हे तेवढंच खरं. मराठवाड्यात त्या काळात वेगवेगळ्या 'पीठा'तून तावून सुलाखून बाहेर पडलेल्या बहुसंख्यांचे, व्यावसायिक चारित्र्य असेच लखलखीत आहे आणि त्यांपैकी एक मर्लापल्ले आहेत! त्यांनी तडजोड केली नाही. ते कठोरच नव्हे, तर अति कठोर होते असा तक्रारीचा सूर नक्कीच काही वेळा काढला गेला, पण त्यांच्या न्यायिक अधिकारपदाच्या

चारित्र्याबद्दल कधीही शंका घेतली गेली नाही. त्यांनी कोणती क्षुल्लकशीही तडजोड केली असे कधीही खाजगीतही बोलले गेले नाही, हेच केवळ महत्त्वाचं आणि अनमोलही . सध्याच्या काळात असं स्वच्छ असणं किती महाकठीण आहे, हे त्या व्यवस्थेचा स्वखुशीने किंवा नाइलाजाने एक भाग झालेल्या आणि न झालेल्याही मोजक्यांना चांगलं ठाऊक आहे.

मर्लापल्ले यांनी घटना आणि कायद्याच्या पातळीवर एक न्यायमूर्ती म्हणून बजावलेल्या कामगिरीची नोंद लॉ बुक्समध्ये होईलच. तरी, त्यांचे काही वेगळे अनुभव सांगायलाच हवेत. क्रिमीलेअरच्या संदर्भातला त्यांचा एक निर्णय महत्त्वाचा ठरला. मराठ्यांना कुणबी संबोधताच येणार नाही असा एक निर्णय मार्लापल्ले यांनी न्यायमूर्ती म्हणून दिला आणि त्यावर बहुसंख्य नाराज झाले. त्याचा काहींना चांगलाच फटका बसणार होता. मात्र मर्लापल्ले त्यांच्या निर्णयापासून ढळले नाहीत. कायद्याच्या चौकटीत अतिशय काटेकोरपणे त्यांनी या संवेदनशील विषयाला हात घातला होता. त्यामुळे अप्रिय होण्याचाच धोका होता आणि त्यांनी तो स्वखुशीने पत्करलाही. पुढे सर्वोच्च न्यायालयानेही हा निर्णय उचलून धरला. माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण हे मराठवाड्यातील मोठं प्रस्थ. त्यांच्या राजकीय चारित्र्यावर गैरव्यवहाराचा एकही, अगदी अदृश्यसुद्धा डाग नाही. त्यांचे पुत्र अशोक चव्हाण मात्र वादग्रस्त ठरले. त्यांच्या व्यवहाराबद्दल मोठी चर्चा मराठवाड्यात होती. नांदेडच्या त्यांच्या शिक्षण संस्थेच्या जागेच्या बाबतीत एक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल झाली आणि सनसनाटी निर्माण झाली. ही याचिका, कोणी दाखल केली, वकील कोण होते वगैरे तपशील आता आठवत नाहीत. पण शंकरराव यांच्या दबदब्याचा तणाव होता यात शंकाच नाही. या याचिकेवरील निर्णय जाहीर होण्याच्या काळात मी न्यायालयाच्याच परिसरात होतो. अशोक चव्हाण यांच्या संस्थेसाठी जागा-संपादन बेकायदेशीर असल्याचे न्या. मर्लापल्ले यांनी जाहीर केले आणि न्यायालयात अक्षरश: सन्नाटा पसरला. न्या. मर्लापल्ले यांनीच जणू काही अपराध केला असा अनेकांचा आविर्भाव होता. अनेकांना न्यायालयाचा निर्णय मनोमन अमान्य होता, इतकी शंकरराव यांची प्रतिमा शुभ्रधवल होती. (शंकरराव चव्हाण यांची पुण्याई अशी, की अनेक वृत्तपत्रांनी ही बातमीही प्रकाशित केली नव्हती) मर्लापल्ले मात्र अविचल होते. या निर्णयाला पुढे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयानेही न्या. मर्लापल्ले यांचा निर्णय ग्राह्य ठरवला आणि मर्लापल्ले यांची निःस्पृह न्यायिक अधिकारी म्हणून असणारी प्रतिमा आणखी उजळून निघाली.

न्या. मर्लापल्ले यांचा एक अनुभव तर संवेदनशीलतेच्या विलक्षणतेचा कळसच म्हणायला हवा. राज्यातल्या एक बड्या राजकीय नेत्याच्या मुलाने सुरू केलेल्या कारखान्यासाठी, शहराचा विकास होतो म्हणून काही शेतकऱ्यांनी त्यांची मोठी शेतजमीन दिली आणि ते अल्पभूधारक झाले. त्या राजकारणी मुलग्याची हाव मात्र भागलीच नाही, त्यां अल्पभूधारकांची उरलेली शेतजमीनही घेण्याचे त्याने ठरवले. वडील मंत्री असल्याने जमीन संपादनाची कारवाई प्रशासनाने तत्परतेने सुरू केली. ते शेतकरी हवालदिल झाले, कारण जमीन संपादन झाली तर ते सर्वजण भूमिहीन होण्याचा धोका होता. जमीन संपादनाची ती कारवाई म्हणजे सत्तेच्या माजाचे आणि त्यापुढे लाचार झालेल्या प्रशासनाचे ओंगळवाणे उदाहरण होते. हे शेतकरी उच्च न्यायालयात गाऱ्हाणे घेऊन आले. ती याचिका नेमकी न्या. मर्लापल्ले यांच्यासमोर लागली. वस्तुस्थिती स्पष्ट होती आणि शेतकऱ्यांना न्याय मिळायलाच हवा होता. पण कायदेशीर अडचण वेगळीच होती. वकील नवखा होता, त्याला पुरेसा अनुभव नसल्याने ती याचिका योग्य कलमाअंतर्गत करण्यात आलेली नव्हती, हे त्याच्या लक्षातच आलेले नव्हते आणि त्यामुळे ती फेटाळून लावली जाणे किंवा मागे घेतली जाणे हेच केवळ अपरिहार्यच होते. शेतकरी न्यायापासून वंचित राहणार, भूमिहीन होणार या कल्पनेने मर्लापल्ले विलक्षण अस्वस्थ झाले. मी त्या याचिकेचा कोणताही उल्लेख न करता, तिच्यातील माहितीच्या आधारे एक स्वतंत्र बातमी तयार केली आणि ती याचिका अंतिम सुनावणीसाठी येण्याआधी, लोकसत्तात प्रकाशित केली. न्यायमूर्ती म्हणून ती याचिका फेटाळण्याचा मनोदय मर्लापल्ले यांनी व्यक्त केल्यावर, ती याचिका परत घेत असल्याचे प्रथेप्रमाणे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी मान्य केले. सरकार पक्ष एकदम सुखावला. तशी परवानगी दिल्यावर न्या. मर्लापल्ले यांनी माझी बातमी जनहितार्थ याचिकेचा दर्जा देत दाखल करून घेतली आणि मग पुढे सरकारला असे काही धारेवर धरले, की ती शेतजमीन परत घेण्याचा निर्णय सरकारने रद्द केला आणि काही शेतकरी भूमिहीन होण्यापासून वाचले... एखाद्या न्यायिक अधिकाऱ्याची इतकी कर्तव्यकठोर निर्णयशक्ती आणि माणुसकी जपणारे उत्कट वर्तन, मी एक पत्रकार म्हणून प्रथम अनुभवले. इतक्या वर्षांत या लोकविलक्षण अनुभवाची पुनरुक्ती माझ्या वाट्याला पुन्हा आलेली नाही. न्या. मर्लापल्ले यांचे व्यक्तिमत्त्व काहीसे उग्र वाटणारे आणि जरबयुक्त पण ते त्यांचे बाह्य स्वरूप झाले. त्यांच्यात केवढा संवेदनशील माणूस दडलेला आहे, याचे हे भारावून टाकणारे उदाहरण आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक खात्यातील शेषराव सूर्यवंशी आणि खुशालचंद बाहेती या दोन अधिकाऱ्यांमुळे शंभरावर कोटींचा जालना येथील भूखंड घोटाळा माझ्या हाती लागला. खूप बातम्या दिल्या तरी त्या घोटाळ्याची चौकशी काही होत नव्हती. सरकारातील बहुतेक मंत्री आणि प्रशासनातील संबंधित वरिष्ठ अधिकारी चौकशीसाठी 'हो' म्हणत, पण चौकशी पुढे रेटलीच जात नसे. अखेर या घोटाळ्याच्या चौकशीच्या मागणीसाठी औरंगाबाद खंडपीठात एक

याचिका करण्यात आली. रोटेशन बदलल्यावर ती याचिका न्या. मर्लापल्ले यांच्या खंडपीठासमोर आली. सुनावणीसाठी येणारी याचिका आधी काळजीपूर्वक वाचण्याची न्या. मर्लापल्ले यांची सवय. (अशा पूर्वतयारीसाठी न्यायालयीन कामकाज संपल्यावर, अन्य कोणत्याही व्यापात न गुंतण्याची सवय त्यांनी लावून घेतलेली होती). त्यातच जालना भूखंड घोटाळ्याच्या बातम्या वाचलेल्या असल्याने, न्या. मर्लापल्ले यांनी जालना भूखंड घोटाळ्याच्या चौकशीसाठी निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांचा एक लवाद नियुक्त केला. त्या लवादाच्या कामावर काळजीपूर्वक लक्ष ठेवून अहवाल तयार करवून घेतला. लवादाने जालना भूखंड घोटाळ्याची व्याप्ती शंभर कोटींवर निश्चित केली पण पुढे मर्लापल्ले यांची औरंगाबाद खंडपीठातून बदली झाली आणि सारेच थंडावले! एका घोटाळ्याचा लॉजिकल एंड झालाच नाही, ही खंत आजही माझ्या मनात आहे.

अलीकडच्या काही वर्षांत राज्यात एका राजकीय पक्षाची मक्तेदारी संपुष्टातच आलेली आहे त्यामुळे सत्ताप्राप्तीसाठी–युती म्हणा की आघाडी म्हणा–सरकारे अपरिहार्य झालेली आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यासोबत उपमुख्यमंत्रिपदही तडजोड म्हणून अस्तित्वात आलेले आहे. खरं तर उपमुख्यमंत्रिपद ही काही घटनात्मक तरतूद नव्हे. त्यामुळे अधिकाराबाबत सेकंड इन कमांड असे जे राजकीय वातावरण निर्माण केले जाते, त्यात अजिबात तथ्य नाही. याबाबत प्रशासनात कायम चर्चा असते पण सत्तेपुढे शहाणपण टिकत नाही असे नेहमीच म्हटले जाते आणि त्याचा अनुभवही आपण वारंवार घेत असतोच. आता नेमके आठवत नाही, पण एका खटल्यात उपमुख्यमंत्रिपद घटनात्मक नाही, असा निर्वाळा देण्याचा खमकेपणा न्या. मर्लापल्ले यांनी दाखवला. आपल्या राज्यात मराठी बाण्याची चर्चा खूप होते, हा बाणा जपण्याचे भान मात्र खूपच कमीजण जपतात, न्यायमूर्ती म्हणून मर्लापल्ले अशा जपणाऱ्यांपैकी एक. उच्च न्यायालयात आपल्या केबिनबाहेर मराठीत आपल्या नावाची पाटी लावण्याचा बाणेदारपणा त्यांनी दाखवला. ती मराठी पाटी तयार करण्याचा खर्च न करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली तेव्हा त्या खर्चासाठी स्वत:च्या खिशात हात घालण्याची तयारी मर्लापल्ले यांनी दाखवली आणि प्रशासन वरमले !

असे किती तरी अनुभव सांगता येतील. पण ते असो. स्वच्छ, खमक्या चारित्र्याचे आणि माणुसकीची बूज कायम राखणारे मर्लापल्ले यांनी, एक कर्तव्यकठोर न्यायमूर्तिपदाची इनिंग्ज संपवली आहे. सरकार पुरस्कृत कोणताही लवाद किंवा समिती स्वीकारायची नाही हा निर्णय घेऊन, ते दिल्लीत वकिली व्यवसायाच्या दुसऱ्या इनिंग्जसाठी सज्ज झाले आहेत. त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा!


**प्रवीण बर्दापूरकर**
९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com

## ग्रंथालीची नवे कवितासंग्रह




**ओळखीची वाट**
**नीला सत्यनारायण**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**




**वर्तुळ पुसून टाकताना...**
**शारदा नवले**

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ४५ रुपये**


# चित्रपटजनकाचा कुटुंबपट

## प्रभाकर भिडे

'लोकसत्ता'मधील 'दिनविशेष'मध्ये, १६ फेब्रुवारी १९४४ रोजी भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब ऊर्फ धुंडिराज गोविंद फाळके यांचे नाशिक येथे निधन झाल्याची माहिती वाचली होती. त्याच सायंकाळी, आम्ही काही मित्र भेटलो तेव्हा हा विषय निघाला. त्यावेळी मधुकर करंदीकर म्हणाले, दादासाहेबांचे नातू डोंबिवलीत राहतात आणि त्यांच्याशी घरोबा असल्याचे त्यांनी सांगितले. ते दादासाहेबांच्या जवळील नात्यापैकी आहेत. यामुळे मला दादासाहेबांच्या वारसांना भेटायची उत्सुकता लागली. करंदीकरांच्या साहाय्याने ते शक्य झाले आणि या चित्रपटजनकाच्या ध्येयासक्तीबद्दल आणि पुढील पिढ्यांबाबत जाणून घेता आले.

दादासाहेबांना जाऊन आता अडुसष्ट वर्षे झाली. त्यांनी १९१३ साली 'राजा हरिश्चंद्र' हा चित्रपट निर्माण करून घडवलेला इतिहास सारे जाणतात. त्यांच्या नावाने केंद्र सरकारचा 'दादासाहेब फाळके पुरस्कार' हा चित्रपटसृष्टीमधील सर्वोच्च पुरस्कार देण्यात येतो. अशा या चित्रपटसृष्टीच्या जनकाच्या पुढील पिढ्या ती काय करतात, त्यांना दादासाहेबांच्या कर्तृत्वाबाबत काय वाटते, यासंबंधीची माहिती जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न.

'राजा हरिश्चंद्र'च्या निर्मितीला पुढील वर्षी शंभर वर्षे होतील. या शतकभराच्या प्रवासात चित्रपटसृष्टीने घेतलेली भरारी- मुंबईतील प्रसिद्ध बॉलिवुड, गोरेगाव



येथे महाराष्ट्र सरकारने उभारलेली चित्रनगरी, विविध अभिनेते/अभिनेत्री यांचा जनमानसा-वरचा असलेला पगडा बघून नवल वाटते. इतकेच नव्हे, तर गेल्या पन्नास वर्षांपासून तरुण पिढी त्यांतील कलावंतांकडे आदर्श म्हणून बघते, इतके हे माध्यम समाजमनावर विराजमान झाले आहे.

तंत्रज्ञानातील नवीन शोधांमुळे चित्रपटाची तांत्रिक अंगे प्रचंड प्रमाणात सुधारली असून नवीन डॉल्बी सिस्टिममुळे चित्रपट अधिक सुंदर व देखणे निर्माण होतात. ही मायानगरी एक प्रतिसृष्टी झाली आहे. साहजिकच देशभरातून विविध कलाकार त्यात नाव कमवायची आकांक्षा बाळगतात. त्यामध्ये मिळणाऱ्या प्रचंड पैशांमुळे व लोकप्रियतेमुळे सर्वसामान्यांना इतर कुठल्याही इंडस्ट्रीपेक्षा त्याचे जास्त आकर्षण वाटते.

हे सर्व होत असताना, भारतीय चित्रपटसृष्टीला ज्यांनी जन्म दिला, यशस्वीपणे सांभाळली, त्यांना आपण कितपत न्याय दिला, त्यांची बूज राखली का, त्यांच्याविषयी किती कृतज्ञता ठेवली; याचा विचार केला तर पदरी निराशा येते.

मुंबईत, १९३९ साली, रणजित स्टुडिओचे मालक चंदुलाल शहा यांच्या अध्यक्षतेखाली, भारतीय चित्रपटसृष्टीचा रौप्य महोत्सव थाटात साजरा झाला. त्यासाठी दादासाहेब फाळके यांना निमंत्रण पाठवले, पण व्यासपीठावर स्थान नव्हते! त्या समारंभाला प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक, प्रभात स्टुडिओचे मालक शांतारामबापू हजर होते. त्यांना राहवले नाही. त्यांनी पुढाकार घेतला व दादासाहेबांना आग्रहाने व्यासपीठावर नेले. दादासाहेबांनी भाषण लिहून आणले होते. ते म्हणाले, 'गरिबाघरची ही लेक आता श्रीमंता- घरी पोचली आहे...' बोलताना त्यांना भरून आलं आणि मग गजानन जहागीरदार यांनी त्यांचं भाषण वाचून दाखवलं.

या समारंभाच्या निमित्ताने व दादासाहेबांची आर्थिक व शारीरिकदृष्ट्या खालावलेली परिस्थिती बघून, शांताराम-बापूंनी सर्व चित्रपट निर्मात्यांना विनंती केली, की आपण सर्व मिळून दादासाहेब फाळके यांना एक लहानसे घर त्यांच्या गावी, नाशिक येथे, बांधून देऊ. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे फक्त दोन-तीन निर्मात्यांनी थोड्या थोड्या रकमा या कार्याकरता दिल्या. चित्रपटसृष्टीतील क्षुद्र

वृत्ती बघून शांतारामबापूंचे मन उद्विग्न झाले. मग त्यांनी जमलेल्या छोट्या रकमेत प्रभाततर्फे बरीचशी भर घालून ती रक्कम नाशिकला दादासाहेबांकडे पाठवून दिली. त्यानंतरही ते दरमहा काही रक्कम नियमितपणे पाठवत असत. दादासाहेबांच्या पत्नी सरस्वतीबाई फाळके यांनी त्याचा अतिशय कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून बापूंना पत्र पाठवले. पुण्यालाही दादासाहेब आजारी असताना शांतारामबापू त्यांना भेटले होते व त्यांना आवश्यक ती मदत केली होती. शांतारामबापू दादासाहेबांना म्हणत, की तुमच्यामुळेच आम्ही या व्यवसायात लाखो रुपये कमावत आहोत. ते दादासाहेबांचा उल्लेख नेहमी कृतज्ञतापूर्वक करत. त्यांनी जेव्हा भारतातील पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा', १९३२ साली बनवला त्यासाठी जी कथा निवडली, तीही राजा हरिश्चंद्राची असावी, हा केवळ योगायोग म्हणावा का?

दादासाहेब फाळके यांनी अनेक पौराणिक कथांवर व प्रसंगांवर बरेच (३०-४० च्यावर) चित्रपट निर्माण केले. लंकादहन, भस्मासूर-मोहिनी, कृष्णजन्म, कालियामर्दन असे चित्रपट त्यांनी निर्माण केले. ज्या गावात चित्रपटगृहे नसत तिथे फाळके स्वत: प्रोजेक्टर घेऊन जात व लोकांना चित्रपट दाखवत. त्यांच्या या भगीरथ प्रयत्नांमुळे सर्वसामान्य जनतेत चित्रपट माध्यमाबद्दल कुतूहल व आकर्षण झाले होते. 'लंकादहन' हा चित्रपट मुंबईला व इतर ठिकाणी इतका चालला, की त्याचे खेळ करून नाशिकला परतताना जमलेले पैसे बैलगाडी भरून आणले, अशी आख्यायिका होती.

कोहिनूर कॉटन मिलचे मालक आपटे दादासाहेबांच्या चित्रपटात आर्थिक गुंतवणूक करत. व्यवहार व कला यात तडजोड न करण्याच्या दादासाहेबांच्या भूमिकेमुळे आणि स्पष्टवक्तेपणा व तत्त्वांना मुरड न घालणाऱ्या वृत्तीमुळे पुढे त्यांनी चित्रपटांत आर्थिक गुंतवणूक करणे थांबवले. साहजिकच पुढील चित्रपटनिर्मिती थांबली. खर्च मात्र चालू राहिले. त्यावेळी बँका व मदत देणाऱ्या इतर आर्थिक संस्था नसल्यामुळे खासगी गुंतवणुकीवर अवलंबून राहावे लागे. खासगी गुंतवणूक करणारे चित्रपटनिर्मितीत ढवळा-ढवळ करत. साहजिकच स्वाभिमानी व हुशार कलावंतांची कुचंबणा होई; जी दादासाहेबांना मंजूर नव्हती.

चित्रपट हा श्वास असलेल्या दादासाहेबांचे कुटुंबाकडे मात्र म्हणावे तसे लक्ष नव्हते. त्यांना पाच मुलगे व दोन कन्या होत्या. सर्व मुलगे व मुली हुशार व कलावंत होते, पण दुर्दैवाने त्यांना वडिलांच्या व्यवसायाचा म्हणावा तेवढा उपयोग झाला नाही. चित्रनिर्मितीत गुंतलेल्या दादासाहेबांचे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष नसे. तरी प्रत्येक मुलाने आपापल्या कर्तृत्वावर स्वत:चे जीवन घडवले. दादासाहेबांची अखेरची परिस्थिती हलाखीची असल्याने, तारुण्यातील मुलांना स्वत:चा मार्ग स्वत:च शोधावा लागला.

दादासाहेबांचा मोठा मुलगा भालचंद्र धुंडिराज फाळके. त्याला 'बाबाराया' म्हणत असत. हा मुंबईला राहून फिल्म डिस्ट्रिब्युशनचा व्यवसाय करत असे. काही काळ त्याला चांगली कमाई होत होती, पण पुढे वडिलांची चित्रपटनिर्मिती थांबल्यामुळे त्याचा परिणाम फिल्म डिस्ट्रिब्युशनवर झाला. त्यावेळी दुसऱ्या निर्मात्याच्या फिल्म घेऊन व्यवसाय करण्यास सुरुवात झाली नव्हती. साहजिकच त्याचा परिणाम म्हणजे आर्थिक स्थिती खालावली. हे बाबाराया देखील मनस्वी होते.

दुसरे चिरंजीव नीळकंठ. दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर सैन्यात अनेक संधी उपलब्ध असत. तशा जाहिराती ब्रिटिश सरकार प्रसिद्ध करत असे. नीळकंठ यांनी ब्रिटिश सैन्यदलात प्रवेश घेतला. दुसऱ्या महायुद्धात मद्रास रेजिमेंटमधून जर्मन सैन्याशी लढताना ते पकडले गेले. काही काळ जर्मन तुरुंगात होते. युद्धसमाप्तीनंतर सुटले, पण नोकरीही गेली. त्यांना विविध भाषा शिकण्याची हौस होती. त्यांनी तुरुंगात जर्मन तुरुंगाधिकाऱ्याकडून जर्मन भाषा आत्मसात केली. पुढे इंडोजर्मन कल्चरल सोसायटीतर्फे शब्दकोश मिळवून जर्मन भाषेत प्रावीण्य मिळवले. स्वातंत्र्यानंतर अनेक जर्मन कंपन्यांनी आपापले व्यवसाय, कारखाने भारतात स्थापन केले. त्यावेळी हे इंग्रजी-जर्मन दुभाषी म्हणून काम करू लागले. त्यांनी अनेकांना जर्मन भाषा शिकवण्याचा प्रयत्न केला किंवा शिकण्यास उद्युक्त केले. त्यांना चिनी भाषाही थोडीफार येत होती. त्यांनी काही काळ जर्मन वकिलातीमध्ये नोकरी केली. पुढे त्यांना निवृत्ती वेतन मिळाले. त्यांची पत्नी हयात असून, त्यांना यजमानांचे निवृत्ती वेतन मिळते. त्यांना दोन कन्या आहेत. एक मुलगा- किरण फाळके-यांचे वास्तव्य डोंबिवली येथे आहे. ते स्वत: मेंडोलिन, सिंथेसायझर अशी काही वाद्ये वाजवतात. त्यांचा आवाज चांगला असून त्यांचा म्युझिक ग्रुप आहे. ते विज्ञान पदवीधर आहेत आणि एका केमिकल कंपनीत नोकरी करत होते. या व्यतिरिक्त ॲक्युपंक्चर या चिनी थेरपीची प्रॅक्टिस करतात. त्याकरता ते काही दिवस चीनला जाऊन आले आहेत.

तिसरे चिरंजीव प्रभाकर. हेही प्रथम ब्रिटिश आर्मीत होते. दुर्दैवाने, पूर्व आशियात जपानी सैन्याबरोबर लढण्यासाठी गेले असताना पकडले गेले. हेही थोडे दिवस जपानला तुरुंगात होते. सुटल्यावर थोडे दिवस आझाद हिंद सेनेत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबरोबर होते. पुढे, १९४५ साली युद्धसमाप्ती झाली तेव्हा आझाद हिंद सेनेत गेल्यामुळे त्यांना ब्रिटिश सरकारकडून निवृत्तीवेतन मिळू शकले नाही. त्यांचे वास्तव्य नाशिकला होते. हेही अतिशय बुद्धिमान होते. त्यांनी रंगीत चित्रपटाची निर्मिती करण्यासाठी मशीन बनवले व त्याचे पेटंट घेतले होते. काही काळ एस.टी.मध्ये नोकरी केली. पुढे निवृत्तीनंतर फुगे बनवण्याचा कारखाना, नाशिकला आपल्या हिंद सिनेटोन जनकाश्रमात काढला. त्यांचा मुलगा दीपक मोठा झाल्यावर एक दुकान काढले. मुलाने आयटीआयमध्ये डिझेल मॅकनिकल कोर्स पूर्ण केला. आता ते नाशिकमध्ये डिझेल इंजिनासंबंधी स्वतंत्र व्यवसाय करतात. त्यांचे

नाशिकमध्ये स्वत:चे घर आहे.

चौथे चिरंजीव सुरेश. ते उत्तम गायक व नट होते. अत्रे थिएटरमध्ये अनेक नाटकांत त्यांनी भूमिका केल्या आहेत. अत्र्यांच्या प्रसिद्ध 'तो मी नव्हेच' या नाटकात, एक हजार प्रयोगांत विविध भूमिका केल्या. पुढे चित्रपटांतही कामे केली. त्यांचे वास्तव्य डोंबिवली येथे होते. त्यांचे पुत्र सूर्यकांत पदवीधर झाले. राष्ट्रीयकृत बँकेत मॅनेजर म्हणून ते काम करतात. मुलाचे वास्तव्य मुलुंड येथे आहे.

पाचवे चिरंजीव देवदत्त. हे उत्तम पेटी-वादन करत. त्यांचा आवाजही सुंदर असून गाणी म्हणत असत. ते मराठी संगीत नाटकात पेटीची साथ करत. कीर्तनालाही साथ करत. अतिशय साधे, सरळमार्गी व निर्व्यसनी होते. फावल्या वेळात ते दादरला उदबत्त्या विकत. त्यामध्ये त्यांना बऱ्यापैकी पैसे मिळाले. त्यांचे वास्तव्येही दादरला होते. ते अविवाहित राहिले.

दादासाहेबांना दोन कन्या होत्या. मंदाकिनी ही डॉ. आठवले यांच्याकडे नाशिकला दिली होती. त्यांनी दादासाहेबांच्या 'कालियामर्दन' या चित्रपटात बालकृष्णाची भूमिका केली. कालियाच्या फण्यावर उडी मारायचा प्रसंग होता. मंदाकिनी त्यास घाबरत होत्या. त्यावेळी दादासाहेब म्हणाले, 'तुझ्या उडी मारण्यावर आपला चरितार्थ अवलंबून आहे!' पुढे लग्न झाल्यावर त्यांनी नर्सिंगचा कोर्स पूर्ण केला. यजमान डॉक्टर असल्यामुळे नाशिकला मुक्ताबाई हॉस्पिटल काढले. ते बरेच वर्षे चालवले. या पण धडाडीच्या व कर्तृत्ववान होत्या. त्यांचा पुत्र विवेक हे 'एक्सलो' कंपनीत मॅनेजर आहेत.

दादासाहेबांची दुसरी कन्या मालती ही माहीम-मुंबईला श्रीकृष्ण पुसाळकर यांना दिली होती. त्यांचे यजमान सचिवालयात मोठ्या हुद्यावर होते. त्यांचा ओढा अध्यात्माकडे होता. ते आरवीरकर यांचे शिष्य होते. त्यांची प्रवचने ऐकत. निवृत्तीनंतर ते स्वत: प्रवचन देत. त्यांना शेखर हा मुलगा आहे. शेखर भांडुपला क्रॉम्प्टन ग्रीव्हज्‌मध्ये नोकरी करून निवृत्त झालेत. त्यांची पत्नी मृदुला ही नोकरी करते. दोघांनी दादासाहेबांच्या बऱ्याच वस्तूंचा संग्रह केला आहे. यांचेही वास्तव्य माहीम येथे आहे. दादासाहेबांचे घर आणि स्टुडिओ यांच्या खास प्रतिकृती त्यांनी बनवून घेतल्या आहेत. दादासाहेबांबद्दल त्यांच्या या नातसुनेला असलेला जिव्हाळा विलक्षण आहे. त्यांच्या कार्याच्या स्मृती जपल्या जाव्या, नव्या पिढीला हा वारसा पाहायला मिळावा म्हणून, दादासाहेबांचे मूळ घर तसेच जतन व्हावे यासाठी त्यांनी विविध स्तरांवर केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. फाळक्यांच्या घरात आल्याचा अभिमान सांगताना त्या भारावून जातात.

दादासाहेबांच्या पत्नी सरस्वतीबाई फाळके या बडोदे येथील शंकर वासुदेव करंदीकर यांच्या कन्या. हे करंदीकर घराणे हे कलावंताचे, विशेषत: गायकांचे होते. सरस्वतीबाईंचा स्वभाव मनमिळावू व परोपकारी होता. साहजिकच दादासाहेबांच्या सर्व उद्योगांत त्यांचा पाठिंबा व सहकार्य असे. चित्रपटात काम करणाऱ्या सर्व लोकांची जेवणाखाण्याची व इतर व्यवस्था त्या जातीने बघत. त्यांनी इतरही गरजू मुलांना आपल्या घरी ठेवून मदत केली आहे. त्यामध्ये दोन मुलांनी पुढे त्यांचे स्मरण ठेवले. एक होते माधवराव शुक्ल व दुसरे साने.

सरस्वतीबाई फाळके यांना तीन भाऊ होते. त्यांचे मोठे बंधू चिंतामण शंकर करंदीकर. हे बडोद्याहून नोकरीसाठी छोटा उदयपूर या संस्थानात गेले. तेथे निवृत्त झाल्यावर व उत्तम गायक असल्यामुळे त्यांची तिथेच दरबारचे 'राजगायक' म्हणून नेमणूक झाली.

दुसरे बंधू, अनंत. हे त्यांचे मामा व प्रसिद्ध नट भाऊराव कोल्हटकर यांच्याबरोबर किर्लोस्कर नाटक कंपनीत होते. कंपनीच्या बऱ्याच नाटकांत ते गायकनटाचे काम करत. त्यानंतर काही वर्षांनी अहमदाबाद येथे ऑल इंडिया रेडिओवर त्यांनी गायक म्हणून काम केले. याच कोल्हटकरांकडून दादासाहेबांना सेट वा सेटचे सामान मिळे.

तिसरे बंधू, वासुदेव. हेही नाट्य व्यवसायात होते. पुढे ते दादासाहेबांच्या कंपनीत काम करत. स्वत: सरस्वतीबाई उत्तम गायिका होत्या. म्हणूनच त्यांचा विवाह दादासाहेबांसारख्या हरहुन्नरी कलाकाराशी झाला होता.

माधवराव शुक्ल यांनी पुढे 'नाशिक मेडिकल स्टोअर्स' औषधाचे दुकान काढले. त्यामध्ये त्यांना चांगले उत्पन्न मिळाले. त्यातून गोळे कॉलनी या प्रसिद्ध, उच्चभ्रू वस्तीमध्ये त्यांनी बंगला बांधला. आपल्या बंगल्याशेजारी त्यांनी दादासाहेबांसाठी शांतारामबापूंनी दिलेल्या पैशांमधून एकमजली घर बांधले. ते दादासाहेबांचे हितचिंतक होते. त्या घराचे नावही 'हिंद सिनेटोन जनकाश्रम' असे ठेवले. या वास्तूमध्ये दादासाहेबांनी अखेरचे जीवन व्यतीत केले. तेथेच त्यांचे निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई आपल्या मुलाबाळांसह तेथे राहत होत्या.

पुढे मुले मोठी झाली. परंतु दादासाहेबांच्या मुलांना वडिलांच्या कर्तृत्वाचा विशेष फायदा झाला नसला तरी बहुतेक मुलांकडे (इतकेच नव्हे, तर नातवांकडे) आईवडिलांचा गायन-वादन वगैरे कलांचा वारसा चालत आलेला दिसतो. तसाच तो मनस्वीपणात असल्यामुळे इतरांची मदत न घेता स्वकर्तृत्वावर त्यांचा भर राहिला. मुले सुधारक होती. नीळकंठ यांनी मरणोत्तर नेत्रदान केले. तसेच निधनानंतर काही धार्मिक विधी करू नये असे लिहून ठेवले होते. २५ वर्षांपूर्वी नेत्रदानाची संकल्पना नुकतीच रुजू लागली होती.

एका मनस्वी घराण्याची ही कथा. १६ फेब्रुवारीच्या त्या दिनविशेषामुळे, दादासाहेबांच्या वारसांकडून समजलेली; मनात उरलेली.

**प्रभाकर श. भिडे**
राधाश्री सोसायटी, ब्लॉक नं. २०२,
सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व)
भ्रमणध्वनी - ९८९२५६३१५४

# गोंडवनात मराठीचा जयजयकार

**प्राचार्य मदन धनकर**

चंद्रपुरातील ८५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरळीत पार पडले. तीन दिवसांचे संमेलन आयोजकांनी पाच दिवसांचे केले तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. पर्यावरण जागृतीसाठी घेतलेले विद्यार्थी युवक संमेलन आणि महिला सबलीकरणासाठी सज्ज महिला संमेलन, यात दोन दिवस घालवल्यावर तीन दिवसांच्या मुख्य संमेलनाचे शिवधनुष्य आयोजक उचलू शकतील का, ही शंकाच मुळी निराधार ठरवून स्वागत समितीने संमेलन भव्य व निरपवाद केले. ५३व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे होते. ८५व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तेच राहिले. त्यांच्याच नेतृत्वाखाली कार्यरत चमू दोन्ही वेळी जवळपास सारखीच होते. ५३व्या संमेलनानंतर ते लगेच खासदार व पुढे केंद्रीय अर्थराज्यमंत्री झाले. दरम्यान शिक्षण संस्थांमधील त्यांचे नेतृत्व अधिक सक्षम व सर्वसमावेशक झाले. मुख्य कार्यवाह प्रा. सुरेश व्दादशीवार पुढे वि.सा. संघाचे व नंतर साहित्य महामंडळाचे अध्यक्ष झाले. यावेळी मुख्य कार्यवाह प्राचार्य डॉ. कीर्तिवर्धन दीक्षित यांनी आपले कार्यकर्तृत्व सिद्ध केले.

१९७९ साली ५३वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन, संमेलनाध्यक्षांच्या निवडणुकीमुळे गाजले होते. स्वागत समितीने डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या नावाचा उघड पुरस्कार केला होता. पत्रपंडित गोविंद तळवलकर यांच्यापासून ते प्रा. माधव मनोहर यांच्यासारख्या साक्षेपी समीक्षकांपर्यंत, सर्वांनी आयोजकांना अक्षरशः झोडपून काढले. खुद्द विदर्भ साहित्य संघाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांनी अध्यक्ष होण्यासाठी मोर्चेबांधणी केली होती. त्यांच्या अपेक्षेनुसार स्वागत समिती त्यांच्या सोबत न गेल्यामुळे, अध्यक्षीय निवडणुकीत विदर्भ साहित्य संघ मौन बाळगून विरोधात राहिला. यामुळे अध्यक्ष म्हणून वामनराव चोरघडे निवडून आले. १९७९ ते २०१२ एवढे अंतर गेल्यावर चंद्रपूर संमेलन झाले. गेल्या ३० वर्षांत क्रमाने संमेलनाचे स्वरूप बदलले आणि उत्सवाचा महोत्सव झालेले संमेलन, आता वाचक आणि रसिक श्रोते-प्रेक्षकांची वार्षिक यात्रा झाली आहे. यात्रेचे सर्व आविर्भाव जपण्यात आयोजक यशस्वी झाले.

अध्यक्षपदाची निवडणूक सुरू झाली. स्वागताध्यक्षांनी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे नाव अधिकृतपणे घेतले. महामंडळाच्या चार प्रमुख घटक संस्थांना मा. श्री. वसंत आबाजी डहाके यांची स्वीकृती होती. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथील प्रा. मिलिंद जोशी यांनी, स्वागत समितीने अध्यक्षाचे नाव सुचवू नये अशी जाहीर भूमिका घेतली. यावेळी बखेडा निर्माण होईल असे वाटले. उमेदवारीसंबंधीचे स्वातंत्र्य स्वागत समितीला मान्य असल्यामुळे जोशी यांच्या सूचनेवर कोणताही आयोजकांनी अभिनिवेश बाळगला नाही. निवडणुकीचा निकाल लागला. एका प्रमुख मराठी दैनिकाने स्वागत समितीवर उमेदवार लादल्याचा हल्लाबोल केला. यावेळी तंटा उभा व्हावा एवढे ढग गोळा झाले, पण स्वागत समितीची, अभिव्यक्ती स्वातंत्र्याला उचलून धरणारी लोकशाही-परायण भूमिकाच प्रभावी ठरली. पुष्कळदा भांडण मनात असते. ते जनात नेणाऱ्या शक्तींना आवर घालावा लागतो.

८५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने वसंत आबाजी डहाके यांची वाङ्मयसेवा आदरपूर्वक मान्य केली. संमेलनाध्यक्षाच्या निवडणुकीत आयोजकांना भूमिका असावी की नाही, हा प्रश्न पुन्हा अनुत्तरित राहिला. अध्यक्षपदाच्या निवडीत किमान चार घटक संस्थांत एकोपा दिसला पाहिजे. अनेकदा एकोपा दृढ झाला की 'रोटेशन' सुरू होते. रोटेशनने अध्यक्ष आले की गुणवत्ता राहीलच याची खात्री नसते. शिवाय, घटक संस्थांचा ताबा कुणाकडे आणि कसा आहे यावरही भूमिका ठरते. अ.भा. मराठी साहित्य महामंडळाचे नेतृत्व सध्या मुंबईकडे आहे. संसदेत किंवा विधिमंडळात महिलांना ५० टक्के आरक्षण जेव्हा लागू होईल तेव्हा होवो, पण महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांत ५० टक्के आमच्या भगिनी आहेत. प्रा. उषाताई तांबे कोणताही वाद निर्माण होऊ नये यासाठी खूपच सावध होत्या. त्यांची सकारात्मक योजकता आणि कुशल सभा-संचालन यामुळे अनेक अनर्थ टळले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ खऱ्या अर्थाने अखिल भारतीय झाले पाहिजे, यासाठी बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना अधिक बळ देऊन सक्रिय करण्याची गरज आहे. वाङ्मयीन उपक्रमशीलता व आर्थिक स्वावलंबन यामुळे महामंडळ अखिल भारतीय होईल. चार प्रमुख घटक संस्थांनी देखील हेच भान बाळगण्याची गरज आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद मूळ संस्था आहे. त्यांनी सिद्ध



**संमेलनात विचार मांडताना प्राचार्य मदन धनकर**

केलेला वाङ्मयीन इतिहास प्रकल्प केवळ अपूर्व आहे. इतिहासाच्या सातव्या खंडातील चारही भागांचे लेखन-संपादन उत्तम आहे. यात भाग १ ला वसंत आबाजी डहाके यांनी लिहिलेली मार्मिक व भारदस्त प्रस्तावना वाचून, त्यांना फोन करून आपला आनंद कळवला.

परंतु संस्थेला आपली शताब्दी साजरी करताना पतंग दूरस्थ उडवावा लागला. अर्थात त्याची दोरी टिळक रोडवरील म.सा.प. कार्यालयातच होती. संस्थेला परावलंबनाचा भेद करावाच लागेल.

८५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन चंद्रपूरला निश्चित झाल्यावर कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी पहिली सभा ८ व ९ आक्टोबर २०११ रोजी झाली. आयोजक व संपूर्ण महामंडळ यांच्यात समन्वयाने व एकोप्याने काम करण्याचे सूत्र होते. यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यावर परिसंवाद हवा होता. राष्ट्रसंत, भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील श्रेष्ठ योद्धा, प्रतिभाशाली कवी, अमोघ वक्तृत्वाचे धनी आणि चिंतनशील राष्ट्रनायक होते. त्यांचे नाव नागपूर विद्यापीठाला दिले आहे. स्वागत समितीने अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाला आदरपूर्वक संमेलनाचे निमंत्रण दिले. मनात कोणताही किंतु न बाळगता सर्वाधिकारी बबनराव वानखेडे व चिटणीस जनार्दनपंत बोथे आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित झाले. स्वागत समितीला सांभाळून घेण्यात त्यांचे प्रकट औदार्य विलोभनीय आहे.

संमेलन स्थळ असलेला राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा परिसर ४२ एकर जागेवर आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी अनेक बाबींची सोय करता आली. ग्रंथ प्रदर्शनासाठी ५० स्टॉल्स येतील हा आमचा अंदाज मात्र भ्रम ठरला. २५ लाखांवर लोकसंख्या असलेली काही शहरे आणि जेमतेम पाच लाखांवर पोचलेले चंद्रपूर यांत भेद तर करावाच लागेल. प्रत्यक्षात ग्रंथ प्रदर्शनाच्या स्टॉल्सनी द्विशतक ठोकले. ज्यांच्या घरात पुस्तकाचे कपाट नाही अशा अनेक नागरिकांच्या हाती आलेल्या व ग्रंथांनी वाकलेल्या बॅग्ज, तिथे दाखल परिवाराचा भाग होऊन बाहेर पडल्या. नागविदर्भ चरखा संघ, मूलच्या स्टॉलवर खादीची १ लक्षावर विक्री झाली. विक्रीसाठी सवलत असताना मिळत नाही एवढा प्रतिसाद मिळालेला पाहून, अध्यक्ष बंडू भडके यांनी आकाशाला हात टेकावे एवढा आनंद व्यक्त केला.

चंद्रपूर गार्डन क्लबच्या सौ. सीमा मामीडवार यांच्या नेतृत्वाखाली असलेला स्टॉल, चंद्रपूर मुद्रा परिषदेचा आर.एम. सकलेचा यांच्या मार्गदर्शनासाठी लागलेला स्टॉल, इतिहासपुरुष दत्ताजी तन्नीरवार यांचे साहाय्य, इंटेकच्या दिल्लीस्थित केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य अशोकसिंह ठाकूर यांचा नाणेसंग्रह, टी.टी. जुलमे यांनी सादर केलेल्या प्रदर्शनातून जागवलेला आदिमानव, आनंदवनचे कला शिक्षक प्रल्हाद ठक यांची स्वतःच्या रक्ताने चितारलेली व्यक्तिचित्रे आणि भूगोल व भूगर्भशास्त्राचे अभ्यासक सुरेश चोपणे यांनी मांडलेल्या आदिम काळातील अनेक वस्तू; बाहेरून आलेल्या प्रतिनिधींना आणि शहरातील रहिवाशांना चकित करणाऱ्या ठरल्या. निखिल तांबेकर यांच्या कॅमेऱ्याने वन-वन्यजीवनाची टिपलेली मुद्रा पर्यटकांना हरवून टाकणारी होती. जिल्ह्यातील उद्योगांनी थाटलेल्या प्रदर्शनातील यंत्र मॉडेल्स विद्यार्थी-विद्यार्थिनी व युवक-युवतींसाठी आकर्षण ठरले.

६ परिसंवाद, २ कविसंमेलने, कथाकथन, कविवर्य फ.मु. शिंदे यांची मुलाखत यात रसिकांनी लावलेली हजेरी थक्क करणारी होती. 'परिसंवादात आमच्याकडे पाचशे ते सातशे श्रोते असतात' असा अभिप्राय महानगरातील एका प्रतिनिधीने दिला. इथे तर दीड हजार श्रोते बसलेले आहेत असा निर्देश करून आश्चर्य व्यक्त केले. डॉ. विजय भटकर यांचा अपवाद सोडला तर निमंत्रित सर्व पाहुणे उपस्थित होते. डॉ. अभय बंग, डॉ. उषाताई देशमुख, न्या. नरेंद्र चपळगावकर, गिरीश कुबेर, डॉ. हरिश्चंद्र बोरकर व न्या. विकास सिरपूरकर यांची भाषणे म्हणजे वैचारिक समृद्धीची पेठ होती. सारेच आपल्या विषय प्रतिपादनातील 'गिरीश' होते. कवयित्री विदुषी डॉ. अरुणा ढेरे व कविवर्य डॉ. विठ्ठल वाघ यांच्या नेतृत्वाखाली संपन्न कविसंमेलने श्रोत्यांना भावली. फ.मु. शिंदे यांची मुलाखत श्रोत्यांनी डोक्यावर घेतली. डॉ. रा.रं. बोराडे नियंत्रित कथाकथन, एवढ्या व्यापक प्रमाणावर चंद्रपूरकरांनी प्रथमच ऐकले.

स्वागत समितीने सर्व विद्यमान पूर्वाध्यक्षांना सन्मानपूर्वक निमंत्रित केले. सुप्रसिद्ध कथाकार 'शांताराम', प्राचार्य के. ज. पुरोहित मात्र तीनही दिवस उपस्थित होते. पूर्वाध्यक्ष उत्तम कांबळे उद्घाटन समारंभात आले. चांगले बोलले. द.मा. मिरासदार यायला निघाले पण प्रकृती अस्वस्थ्याने त्यांना अडवले. संमेलनाध्यक्षाचा सन्मान साधारणतः उतार वयात मिळतो. माजी ११

संमेलनाध्यक्षांपैकी किमान ५ ते ७ येतील असा स्वागत समितीचा कयास होता. पूर्वाध्यक्षांची उपस्थिती हवीच, शिवाय त्यांचे मनोगतही जाणावे म्हणून सर्वांना अध्यक्षीय निवडणूक, कार्यकाळातील कामगिरी, वाङ्मयीन वातावरण यासंबंधी सातशे शब्दांत स्मरणिका 'हिराई'साठी मजकूर लिहिण्याची विनंती केली. के. ज. पुरोहित, राजेन्द्र बनहट्टी, प्राचार्य म.द. हातकणंगलेकर, डॉ. यू. म. पठाण यांचा मजकूर वेळेवर पोचला. स्मरणिकेत तो समाविष्ट आहे. डॉ. विजया राजाध्यक्ष व रा.ग. जाधव यांनी पाठविलेला मजकूर विलंब झाल्यामुळे समाविष्ट करता आला नाही.

रा. ग. जाधव यांना फोनवर वस्तुस्थिती सांगितली; म्हणालो, 'तुकारामाच्या कवितेतील अवतरणक्षमता' हा तुमचा लेख खूप आवडला. तुकाराम महाराजांचे भावजीवन पाहिले, की प्रतिभावंत व्यासमुनी यांचा वैराग्यशाली पुत्र शुकमुनी यांचीच आठवण होते. आपल्या सुपुत्राला हाक देत मागे चालणाऱ्या व्यासांना सारी वृक्षवल्ली होकार देत प्रतिसाद देत राहिली. भंडाऱ्याच्या डोंगरावर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' म्हणणाऱ्या तुकारामाची भावावस्था यापेक्षा वेगळी नव्हती. रा.ग. जाधव यांनी हर्षोत्फुल्ल प्रतिसाद दिला. व्यासंगी माणसे किती प्रसन्न, निर्मळ आणि काठोकाठ भरलेल्या जलकुंभा-सारखी असतात याचा प्रत्यय आला. पूर्वाध्यक्षांनी प्रत्येक संमेलनास उपस्थित राहून सर्वांनाच दिलासा द्यावा असे वाटते.

संमेलनाचा उद्घाटन व समारोप समारंभ देखणे झाले. राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा परिसर म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य नगरी परिसर विद्युत रोषणाईच्या झगमगाटात न्हाऊन निघाला. संमेलनस्थळी सहकुटुंब फिरणारे रसिक 'आपले डोळे निवले' या आनंदात आणि 'कान व मन तृप्त करणारी पर्वणी' याच धन्यतेने फिरत असल्याचे जाणवले. कविकट्ट्यावरील रंगलेली कवींची मैफल आणि प्रकाशन कट्ट्यावरील पुस्तक प्रकाशन दृष्ट लागावे असे होते. दोन दिवसांत ३२ पुस्तकाचे प्रकाशन झाले. चोख वाहन व्यवस्था सर्वांचे लक्ष वेधून घेणारी होती. स्मरण गाथा उजळ करणारी प्रवेशद्वारे व मंडप सर्वांचे लक्ष वेधून घेणारे होते.

प्रा. म.शं. द्वाबगावकर यांचा फोन होता. ते म्हणाले, 'वसंत आबाजी डहाके यांचे अध्यक्षीय भाषण म्हणजे गेल्या दशकांतील उत्तम अध्यक्षीय भाषणाचा नमुना'. प्रमुख अतिथी डॉ. महिपसिंग यांनी भारतातील भाषा भगिनींच्या एकात्म समन्वयाची आवश्यकता स्पष्ट करून, संत नामदेव व समर्थ रामदास स्वामी यांचा पंजाबशी असलेला अनुबंध अधोरेखित केला. उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी रात्री सादर 'मार्कंडादेव नृत्यशिल्पातील साहित्यिक आशय' कार्यक्रम, 'रोचित कला अकादमी' पुणे व 'कथक साधना केंद्र' चंद्रपूर यांनी सादर केला. रोशन दाते व भाग्यलक्ष्मी देशकर यांचे संयुक्त साहस, सांस्कृतिक कार्यक्रम संकल्पनेला वेगळ्या उंचीवर घेऊन गेले. असा कार्यक्रम साहित्य संमेलनात हे धाडसच होते. माझ्या बाजूलाच कविवर्य डॉ. विठ्ठल वाघ बसले होते. ते म्हणाले, 'उच्च अभिरुचीसंपन्न कार्यक्रम झाला.'

चंद्रपूर पंचशताब्दीचे औचित्य साधून कवी, नाटककार श्रीपाद प्रभाकर जोशी यांनी रचलेले स्वागत गीत आशयसंपन्न आहे. पं. श्याम गुंडावार यांनी त्याला भावगर्भ चाल दिली. एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेजच्या ५०० विद्यार्थिनींनी उच्च स्वरात ते सादर केले. त्यामुळे उत्तम वातावरणनिर्मिती झाली. राणी हिराईचा सर्व भारताला परिचय, ही संमेलनाची उपलब्धी आहे. हिराईची तुलना अहिल्याबाई होळकरशी केली जाते. अहिल्याबाई, हिराई राणीच्या उत्तरकालीन आहेत. शिवाय घोड्यावर स्वार होऊन हिराई लढली. तिने भव्य बांधकामे व धार्मिक भावजागरण केले, ते वेगळेच. औरंगजेबाचा सरदार नेकनामखान याच्या आदेशाला न जुमानता तिने राज्यात गोवध बंदी केली. तिचा कार्यकाळ इ.स. १७०४ ते १७१९ होता. मुलगा सज्ञान झाल्यावर राज्याची सूत्रे त्याला सोपवून तिने वानप्रस्थ स्वीकारला.

बाबुराव पुलेश्वर शेडमाके यांचे हौतात्म्य व इंग्रज सेनेशी त्यांनी केलेली झुंज, १९५७ चा सेनानी तात्या टोपे यांच्या पराक्रमाची आठवण करून देणारी आहे. त्याने इंग्रजी सैन्याचा दोनदा पराभव केला. शेवटी कपटाने त्याला पकडून फाशी देण्यात आले. इंग्रज जनरल 'मीड' यांनी तात्यांचे वर्णन 'एरियल' असे केले. बाबुरावांच्या पराक्रमाची गाथा लिहिणाऱ्या इतिहासकाराची भविष्य वाट पाहत आहे. भारताला बाबुरावांचा व्यापक परिचय होऊन त्याचे उचित स्मारक उभारले गेले पाहिजे. संमेलनाच्या समारोप-प्रसंगी कुलगुरू डॉ. वेदप्रकाश मिश्रा व उर्दू कवी हयात कमर यांचा सत्कार औचित्यपूर्ण ठरला. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि.सां. आईंचवार उद्घाटन व समारोप समारंभात प्रामुख्याने हजर होते.

श्रेष्ठ गायक व संगीत दिग्दर्शक पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या अमृत महोत्सवा-निमित्त त्यांचा सत्कार, हे आयोजकांच्या कल्पकतेचे व समयज्ञतेचे शिखरस्थान ठरले. त्यांच्या पत्नी सौ. भारती मंगेशकर व कन्या राधा मंगेशकर यांची उपस्थिती समारंभाची शोभा वाढवणारी ठरली. समारोपानंतर प्रा. श्याम गुंडावार यांनी पसायदान सादर केले. त्याला धरून पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी निर्भर्त्सना केली. अनेकांना ते खूपच खटकले. श्याम गुंडावार यांचे मौन त्यांना अधिक नम्र करून गेले. त्यांचे गाणे आकाशाला भिडले तरी हृदयनाथांची संगीत सरिताक्षुब्ध झाल्यामुळे सारेच पाणी गढूळ झाले.

चंद्रपूरकरांसाठी केवळ संमेलनाचा इतिहास पाहिला तर १९५० साली १२वे वि.सा. संमेलन चंद्रपूरला झाले. गुरुवर्य डॉ. मा.गो. देशमुख अध्यक्ष होते. ६० वर्षांनंतर साजऱ्या झालेल्या ८५व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनात, गुरुवर्य डॉ. उषाताई देशमुख यांचा सहभाग हीरक महोत्सवाचे तेजस्वी भान देऊन गेला.

**प्राचार्य मदन धनकर**
विद्यानगर, गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर ४४२ ४०१

# अष्ट'भुजा' माधवी मेहेंदळे

## अंजली कुलकर्णी

पुण्याच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात माधवी मेहेंदळे हे नाव गेल्या दशकात एकदम पहिल्या रांगेत येऊ पाहताना दिसते, परंतु तेथे ते विराजमान मात्र होत नाही. कारण माधवी मेहेंदळे या एका व्यक्तीत अनेक माधवी मेहेंदळे वस्ती करून आहेत! त्या आज वाङ्मयीन सभेत दिसतात, तर उद्या सामाजिक जागृतीसाठी पथनाट्य संयोजनात गुंतलेल्या असतात, परवा त्यांची त्यांच्या पेंटिंगजच्या प्रदर्शनाची तयारी चाललेली असते वा तत्संबधात लेखन.... आणि असा विविध संचार चालू असताना, प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ म्हणून त्यांचा डोळ्यांचा दवाखाना चुकत नाहीच! त्या चित्रकार, कलावंत, लेखक, चांगल्या व्यवस्थापक आणि मुख्य म्हणजे समाजात विधायक, चांगलं काही घडून येण्यासाठी धडपडणारं कृतिप्रवण व्यक्तिमत्त्वही आहेत.

माधवी मूळ नागपूरच्या. शाळा-कॉलेजात बुद्धिमान म्हणून नावाजलेली मुलगी. त्यावेळी चांगले मार्क्स मिळाले, की मेडिकलला जाण्याची प्रथा होती. त्याप्रमाणे त्यांनी नागपूरच्या गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजला प्रवेश घेतला. तिथं सगळीकडे पहिला नंबर, गोल्ड मेडल वगैरे स्वाभाविकपणे प्राप्त झालं. लग्नानंतर माधवी पुण्यात आल्या. त्या आधी, इंटर्नशिपपासून पुण्यात राहत होत्याच. पुण्यात त्यांना पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा करायचा होता, पण त्यांचं एमबीबीएस नागपूरमधून झालं असल्याच्या कारणानं, त्यांना पुण्यात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश देण्यास खळखळ सुरू झाली. माधवी ह्या मुळातच निर्भय आणि ठाम आत्मविश्वास असलेल्या व्यक्ती. 'मी भारताची नागरिक आहे, मला नियमांप्रमाणे प्रवेश मिळायलाच हवा' असं म्हणून त्यांनी सरळ कोर्टकेस केली. केस दोन-अडीच वर्षं चालली आणि त्या पदव्युत्तर शिक्षणासाठी पुण्यात प्रवेश मिळवण्यात यशस्वी झाल्या!

दरम्यान संसार सुरू झाला होता. दोन मुलंही झाली होती. त्यांनी डेक्कन जिमखान्यावर



**डॉ. माधवी मेहेंदळे या एका व्यक्तीत अनेक माधवी मेहेंदळे वस्ती करून आहेत! वाड.मयीन सभा, सामाजिक जागृतीसाठी पथनाट्य संयोजन, त्यांच्या पेंटिंगचे प्रदर्शन वा तत्संबधात लेखन.... असा त्यांचा विविध संचार चालू असतो. माधवी मेहेंदळे प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ तर आहेतच; शिवाय चित्रकार, कलावंत, लेखक, चांगल्या व्यवस्थापक आणि मुख्य म्हणजे समाजात विधायक, चांगलं काही घडून येण्यासाठी धडपडणारं कृतिप्रवण व्यक्तिमत्त्वही आहेत. सध्या त्यांनी रोटरीच्या माध्यमातून रस्तावाहतुकीसंबंधात जनजागृतीचे काम हाती घेतले आहे....**

राहत्या घराच्या वास्तूत, 'प्रकाश आय हॉस्पिटल'मधून १९८८ साली प्रॅक्टिसला सुरुवात केली. 'डेक्कन'सारख्या लोकवस्ती-मध्ये, चोखंदळ माणसं असलेल्या परिसरात स्वत:ला एस्टॅब्लिश करणं, हेच मुदलात आव्हान होतं. त्यात आणि 'टिपिकल प्रकारच्या संसारा'त त्या मनापासून रमून गेल्या.

अचानक, एके दिवशी त्यांच्या मनात आलं, कदाचित बरेच दिवस ते त्यांच्या नेणिवेत असेलही, की हेच किती दिवस करायचं? डोळ्यांच्या ट्रिटमेंटसंबंधात जेवढी म्हणून नवीन टेक्नॉलॉजी आहे, ती सगळी त्यांनी आत्मसात केली होती. 'नव्या टेक्नॉलॉजीसाठी नवीन गुंतवणूक लागते. सतत नवनवीन तंत्रं पुढे येत असतात, ती साधनसामग्री घेण्यासाठी पुन्हा गुंतवणूक.... ते एक चक्रच होणार- त्यामधून बाहेर येण्याचा मार्ग नाही!' मग त्यांच्या मनात आलं- आपण नक्की काय करतोय? आपण बुद्धिवादी म्हणवतो स्वत:ला, मग आपण इक्विपमेण्ट मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीच्या हातातलं बाहुलं व्हायचं का? इंडस्ट्रीनं बनवलं म्हणून आपण विकत घ्यायचं? आणि हप्ते फेडत बसायचं? ''माझा सगळा दिवस, संपूर्ण रात्र होईपर्यंतचा काळ क्लिनिकच्या त्या खोलीतच बंद होऊन जाई. मग काय करायचं? मला तर सतत समोर काहीतरी लागतं.'' माधवी सरळसोट बोलतात, पण मनापासून बोलतात, त्यामुळे त्यात एक झकास आर्जव असतं, ते ऐकत राहावंसं वाटतं.

दरम्यान, त्यांची एका पेशंटशी मैत्री झाली. ती 'फाइन आर्टस्'मध्ये एम.ए. करत होती. मग माधवींनीही एस.एन.डी.टी. विद्यापीठात 'फाइन आर्टस्' केलं. त्यांनी त्या दोन वर्षांतले सुंदर अनुभव लिहून काढले. 'रंगचिंतन' या नावाचे ते लेख 'सकाळ' आणि 'अंतर्नाद'मध्ये प्रकाशित झाले. माधवी यांना स्वत:चा हा नवीनच शोध लागला! पेंटिंग आणि लिहिणं एकाच वेळी सुरू झालं. त्यांनी विविध विषयांवर लिहायला सुरुवात केली. 'सकाळ', 'लोकसत्ता', 'मिळून साऱ्या जणी', 'अंतर्नाद', 'माहेर' अशा ठिकाणी ते छापूनही आलं. या नव्यानं अवतरलेल्या, वेगळ्या तरल संवेदनेनं लिहिणाऱ्या लेखिकेकडे वाचक औत्सुक्यानं पाहू लागले.

माधवी मेहेंदळे स्वत:च्या या नवीन

गवसलेल्या छंदाचं व त्यावेळच्या मनस्थितीचं समर्पक वर्णन करतात. त्या म्हणाल्या, ''मी सतराव्या वर्षीच्या कोवळ्या वयात वैद्यकाला प्रवेश घेतला आणि तेविसाव्या वर्षी डॉक्टर होऊन बाहेर पडलेदेखील. सगळेच विद्यार्थी असं करत असतात. आम्हाला सतराव्या वर्षी मृत शरीर पाहावं लागतं, त्याचं विच्छेदन करावं लागतं. त्यावेळी मानवी जीवनाची जवळून ओळख होते. स्त्री-पुरुष असं इनहिबिशन संपून जातं. मानसिकतेत बदल होतो. तिथल्या तिथं निर्णय घेण्याची क्षमता आणि वैयक्तिक सुखदु:खं बाजूला ठेवून काम करण्याची वृत्ती निर्माण होते. अधिक संवेदनाशील मनांना विज्ञानाचं अपुरेपण कळतं. आम्ही डॉक्टर म्हणून घडत असताना मनात असे अंतर्बाह्य बदल होत असतात. परंतु मनाचं आणि शरीराचं नातं वैद्यकात नीट शिकवलं जात नाही. मला प्रत्यक्ष व्यवसाय करत असताना हे सारं उमजत गेलं आणि मी वेगवेगळ्या तऱ्हेचं लेखन आरंभलं. त्याच काळात चित्रकलेचा ध्यास घेतला. तो अभ्यास करताना मायकेल अँजेलोपाशी येऊन पोचले आणि तिथं ज्ञान-शोधाचं एक वर्तुळ पूर्ण झाल्यासारखं वाटलं.

जगभरातली चित्रं बघण्याच्या ध्यासापोटी माधवी युरोपमध्ये अक्षरश: गॅलरी टु गॅलरी हिंडल्या. त्यांनी 'आर्ट टुरिझम'वर लिहिलं. त्या अमेरिकेतल्या एका मैत्रिणीसह कुठलंही प्लॅनिंग न करता फिरल्या. ''इटालीत मायकेल अँजेलो मानगुटीवरच बसला. त्याच्याविषयी प्रचंड वाचलं, अभ्यास केला. आता लिहायला पाहिजे असं वाटलं. मग काय राहिलं होतं ते पाहण्यासाठी पुन्हा इटालीला गेले. त्यातून 'मायकेलँजेलो' हे पुस्तक झालं. माधवी सांगत होत्या. त्यांनी जपून ठेवलेली जगण्यातली प्रचंड उत्स्फूर्तता, ऊर्जा आणि संवेदनशीलता पाहून मी चकितच झाले.

ही उत्स्फूर्तता तेवढ्यावरच थांबली नाही. उलट तिथून पुढेच माधवी जे शोधत होत्या, ते जगण्याचं श्रेयस् त्यांना सापडलं. डॉ. राणी बंग यांच्या सहवासात. त्या २००५मध्ये अचानक उठल्या आणि अभय बंग यांच्या कर्मभूमीत पोचल्या. बंग पतिपत्नी चांगलं विधायक काम करतात एवढंच त्यांना माहीत होतं. त्या म्हणाल्या, ''with no agenda मी तिथं गेले, तिथं माझं राणीशी मस्त जमलं. तिथं कार्यकर्त्यांबरोबर आत जंगलांमधून, नक्षलवादी परिसरातूनही हिंडले. दोन-तीन महिन्यांनंतर पुन्हा टीम घेऊन गेले. तेथील लोकांचे डोळे तपासले, त्यांना चष्मे दिले. तिथले सगळे प्रोजेक्ट बघितले. बंग यांनी खेड्यापाड्यांतल्या लोकांसाठी काय काय केलंय ते सगळं बघितलं- बालमृत्यू कमी करण्यासाठीचा 'अंकुर' प्रोजेक्ट, व्यसनमुक्ती, दायांना प्रशिक्षण, आरोग्य प्रशिक्षण....... त्या भेटींतून लक्षात आलं, की एक डॉक्टर पेशंटसाठी समाजात मिसळून काय काय करू शकतो! आदिवासी मुलींसाठी इतक्या सरकारी योजना आहेत, त्यांचे फायदे आहेत, पण ते त्यांना सांगणार कोण? राणी बंगनं ते काम केलं. हा श्रीमंत करणारा मोठाच अनुभव होता. कारण त्यांना काही ठाऊकच नाही. मच्छरदाण्या दिल्या तर त्यांचा वापर ते मासे पकडायला करू लागले किंवा त्या अंगावर पांघरून घेऊ लागले! हे सगळं बघितलं आणि मला स्वत:ला माझा मार्ग सापडला. परत आल्यावर मी राणीवर लेख लिहिला. तेव्हा माझ्या लक्षात आलं की माझा फोकस राणी आहे.'' माधवी सांगत होत्या.

राणी बंग तिकडे 'सेक्स एज्युकेशन'वर शिबिरं घेतात. माधवी यांच्या लक्षात आलं, की शहरी भागातही याची गरज आहे. मग त्यांनी अठरा ते पंचवीस या वयोगटाच्या मुलामुलींसाठी- 'तारुण्यभान' नावाचं शिबिर घेतलं. सुरुवातीला मला फार टेन्शन आलं होतं,'' माधवीताई म्हणाल्या, ''लोक कसं बघतील याकडे, कुणी येतील की नाही? मग प्रत्येक कॉलेजच्या प्राचार्यांना भेटले. त्यांना वाटायचं, की या डोळ्यांच्या डॉक्टर हे काय करतायत? ते म्हणायचे, मुलं बसणारच नाहीत. पण 'लोकसत्ता'सारख्या दैनिकानं सहकार्य दिलं. बातमी छापली. राणीला बोलावलं होतं. काहीच घडलं नाही तर आपण गप्पा मारू असं तिला म्हटलं होतं. पण प्रत्यक्षात हॉल भरून गेला. काही मुलांना परत जावं लागलं.'' मग अशी अनेक शिबिरं माधवी यांनी घेतली. रोटरीच्या त्या अध्यक्ष आहेत. तिथली यंत्रणा त्यांना या कामांसाठी उपयोगी पडते. टीमनं काम करण्याचं महत्त्वही त्या सांगतात.

या शिबिरांत मुलं किती मोकळेपणानं



**पेंटिंगमध्ये रमलेल्या डॉ. माधवी**

बोलतात याची उदाहरणं माधवी यांनी सांगितली. एका मुलीनं त्यांना विचारलं, की सेक्स करताना खूप दुखतं मग त्यात आपण मरतो का? दुसऱ्या मुलीनं आपले आजोबा आपल्यावर रोज बलात्कार करतात असं सांगितलं. मुलामुलींच्या मनात आपल्या शरीराविषयी असणारे न्यूनगंड या शिबिरांत काढून टाकले जातात. त्यांच्या प्रश्नांना रिडिक्युल न करता ते नीट हाताळावे लागतात, असं त्या म्हणाल्या

'मुक्तांगण' आणि रोटरीचं नेटवर्किंग वापरून त्यांनी ॲडिक्शन- व्यसनमुक्तीवरही शिबिरं घेतली. मुलं तंबाखूपासून ते इंटरनेटपर्यंतच्या ॲडिक्शनला बळी पडतात. या मुलांसाठी त्यांनी पथनाट्यस्पर्धा घेतल्या. छोट्या छोट्या संहिता, छोटे विषय, फार मोठे खर्च नाहीत-अशा त्या स्पर्धा प्रभावी ठरल्या. त्यांनी एचआयव्हीबाधित मुलामुलींसाठी विवाहमेळावे भरवले. ''मेडिकली त्यांना त्रास असला तरी मानसिक गरज असतेच ना! त्याही स्थितीत लग्न जमावं म्हणून नटूनथटून येणाऱ्यांना पाहिलं, की पोटात तुटतं.'' त्या सांगतात.

माधवी यांच्यामध्ये अफलातून कल्पकता आहे. रेणू गावस्करांच्या शाळेतल्या मुलांना त्या मध्यंतरी चित्रकला शिकवत होत्या. त्याविषयी त्या सांगत होत्या, ''मी मुलांना मंडईत घेऊन जायची. आम्ही आमच्या घराच्या टेरेसवर जाऊन पतंग उडवायचो, भेळ खायचो. अशाच एकदा टेरेसवर असताना एका मित्राचा फोन आला. तो म्हणाला, 'काय करतेयस?' मी सांगितलं, 'रेणूच्या मुलांबरोबर पतंग उडवतेय.' तो म्हणाला, 'आलोच मी.' आणि अक्षरश: ऑफिसातलं काम टाकून तो दहा

मिनिटांत तिथं हजर झाला.'' रेणू गावस्करांच्या मुलांसाठी माधवी मोफत चेकिंग करतात. तसंच मूकबधिर मुलांनाही त्यांच्याकडे फ्री एण्ट्री आहे.

इतकं सगळं करणाऱ्यात माधवी यांना पुण्यातल्या ट्रॅफिकवर काही काम करण्याची इच्छा आहे, ''परदेशात मुलांना ट्रॅफिकबाबत सक्षम करून मगच रस्त्यावर आणलं जातं. आपल्याकडे ते न करताच आपण त्यांना रस्त्यावर आणतो,'' त्या म्हणतात. रोटरीच्या माध्यमातून छोट्या छोट्या ट्रॅफिक अवेअरनेस फिल्म्स बनवण्याची त्यांची इच्छा आहे. त्यासाठी लागणारा पैसा त्यांना अक्षरश: एक-दोन फोनवर उपलब्ध झाला. चांगल्या कामासाठी पैसा कमी पडत नाही, हा त्यांचा स्वत:चा अनुभव त्या सांगतात. त्या म्हणतात, ''आज डॉक्टर-पेशंट नातं हे अविश्वासानं भरलेलं आहे. पण मला कितीतरी पेशंट जास्तीचे पैसे देऊन जातात. आपल्या कामातला सच्चेपणा, प्रामाणिकपणा लोकांना नक्की कळतो. पुण्यातल्या 'सिटीप्राइड', 'अलका' यांसारखा थिएटरांनी माधवी यांना या फिल्म्स मोफत दाखवण्याचं आश्वासन दिलंय.

माधवी यांना आणखीही बरंच काही करायचंय. भोवताली इतके प्रश्न आहेत आणि माधवी यांची संवेदनशीलता अति-तीव्र. स्वत:वर, माणसातल्या माणूसपणावर आणि बदल घडू शकतो यावर त्यांचा अमीट विश्वास आहे. या सकारात्मक ऊर्जास्रोतानं माधवी मेहेंदळे यांना जणू अष्टभुजाच बनवलंय!

**(डॉ.माधवी मेहेंदळे -९८९०९०४१२३**
madhavimehendale@gmail.com)


**अंजली कुलकर्णी**
३, विघ्नहर अपार्टमेंट,
जयवर्धमान सोसायटी,
बिबवेवाडी रोड, पुणे-४११०३७
भ्रमणध्वनी : ९९२२०७२१५८,
anjalikulkarni1810@gmail.com



# दोन नवीन प्रकाशने







**प्रकाशनसमयी विनायक गोखले, डी.पी. म्हैसकर, शशिकांत तांबे आणि लेखक सुधीर कुलकर्णी**

## कथा जगप्रसिद्ध पुलांच्या...

**सुधीर शं. कुलकर्णी**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**






**प्रकाशनसमयी लतिका भानुशाली, कुमार केतकर, लेखिका निरुपमा प्रधान-सोनाळकर आणि वंदना गुप्ते**

## आठवणींच्या जगात

**जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**

**निरुपमा प्रधान-सोनाळकर**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

चंद्रपूरच्या संमेलनातील एक परिसंवाद...

# नक्षलवाद आणि साहित्य

**डॉ. मनोहर जाधव**

चंद्रपूरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यालयातून फोन आला, ''साहित्य संमेलनातील एका परिसंवादात तुमचे नाव घेतले आहे. आपली स्वीकृती कळवावी'', असे पलीकडून विनयशील आवाजात सांगितले गेले. थोडेसे आश्चर्य वाटले. अखिल भारतीय स्तरावरच्या साहित्य संमेलनात मी यापूर्वी कधी सहभागी झालो नव्हतो, तसे मला कधी निमंत्रणही नव्हते. अशा संमेलनात परिसंवाद वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वाचेही असतात. संमेलनात अनेकदा फेरफटका मारला होता. मित्रांना भेटण्यासाठी हे एक उत्तम निमित्त असते. एवढ्यापुरतेच माझे आतापर्यंत कुतूहल होते. चंद्रपूरच्या आयोजक कार्यालयातून एका परिसंवादात सहभागाविषयी फोन आला आणि मी तोंडी स्वीकृती कळवली. पण सततच्या भ्रमंतीमुळे लेखी स्वीकृती पाठवण्याचे लांबत गेले. यथावकाश तीही पाठवली. 'नक्षलवाद, लोप पावत चाललेली आदिवासी संस्कृती आणि मराठी साहित्य' असा परिसंवादाचा विषय होता. नंतर निमंत्रणपत्रिका मिळाली. सगळा तपशील कळला. आपले नाव या परिसंवादासाठी कुणी सुचवले असावे असा मला प्रश्न पडला.

नक्षलवादी चळवळींच्या संदर्भात माझे वाचन होते, पण त्याबद्दल तसा कोणत्याही स्वरूपाचा थेट अनुभव नव्हता. आपला वैचारिक दृष्टिकोन आणि साहित्य क्षेत्रातील आपला थोडाफार वावर यामुळे आयोजन समितीतील कुणालातरी आपले नाव सुचवावेसे वाटले असेल, असे समजून मी शांत राहिलो.

संमेलनापूर्वी आठ दिवस दिल्लीत केंद्र शासनाच्या एका समितीच्या कामात होतो. पुण्याला पोचून लगेच दुसऱ्या दिवशी चंद्रपूरला जाणे आवश्यक होते. तसे ते जमेल का याबद्दल साशंक होतो. २ फेब्रुवारीला साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष, मित्रवर्य उत्तम कांबळे यांचा फोन आला, 'चलताय् ना चंद्रपूरला?' मी म्हटले, ''आज मला जमत नाहीयू, मी उद्या निघेन.'' ''बरं, मग आपली भेट होणार नाही'', असे ते म्हणाले आणि ते खरेही होते. ते लगेच ३ फेब्रुवारीला परतणार होते. मी विचार करू लागलो. चंद्रपूर येथे संमेलन असल्यामुळे कदाचित नक्षलवादा-संबंधीचा विषय साहित्य संमेलनाच्या परिसंवादात ठेवला असावा. चंद्रपूर, गडचिरोली आणि लगतचा प्रदेश नक्षलग्रस्त म्हणून वर्षानुवर्षे परिचित आहे. त्या परिसरात संमेलन होणार म्हटल्यावर तेथील बर्निंग इश्यू संमेलनात चर्चेला येणार हे स्वाभाविकच होते. त्याच दरम्यान श्रीमंत माने या पत्रकाराने 'दै. सकाळ'मध्ये 'नक्षलवाद्यांच्या कारवाई'-बाबत स्टॅटिस्टिकल डाटा प्रसिद्ध केला होता. गडचिरोलीतील बहादूरशाह आलाम या प्रसिद्ध राजकीय नेत्याची नक्षलवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली होती. त्या संबंधीचा लेख सुरेश द्वादशीवारांनी 'लोकमत'च्या संपादकीय पानावर छापला होता.

परिसंवादाच्या विषय-शीर्षकासंबंधी आदिवासी साहित्यिकांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये मतभिन्नता होती. अर्थात ही मतभिन्नता मला नंतर कळली. परिसंवादात पाच-सहा वक्ते होते, पण त्यात आदिवासी समूहांशी थेट नाते सांगणारा कोणी नव्हता, हे नकळत झाले की कसे झाले, समजायला मार्ग नव्हता. संमेलनस्थळी पोचलो तर तुडुंब गर्दी. उद्घाटन समारंभानंतरच्या पहिल्या दिवशी सकाळीच परिसंवाद होता. विषय महत्त्वाचा. परिसराचा संदर्भ औचित्याला धरून असल्यामुळे श्रोत्यांची संख्या मंडपात मावेना. दिग्गज साहित्यिकांपासून सामान्य लोकांपर्यंत सगळेच गर्दीत सामील. गर्दी असली तरी गडबड, गोंधळ कुठे नव्हता. परिसंवादाचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग होते. त्यांनी जे अध्यक्षीय भाषण केले ते दुसऱ्या दिवशी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुरवणीत छापून आले होते. म्हणजे ते काय बोलणार हे त्यांनी आधीच ठरवले होते आणि 'मटा'ला देऊन टाकले होते. बोलायला माझ्यासोबत 'लोकसत्ता'चे देवेंद्र गावंडे हे आणि औरंगाबादचे मित्रवर्य ऋषिकेश कांबळे होते. नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराबद्दल आणि त्यांच्या बदललेल्या भूमिकेबद्दल, देवेंद्र गावंडे पुणे विद्यापीठात आला असताना त्याचे व्याख्यान आम्ही मराठी विभागात ठेवले होते. ऋषिकेश माझ्यासारखाच परिवर्तनाच्या चळवळीतील आणि दलित साहित्य चळवळीतील कार्यकर्ता-लेखक. मी बोलायला उभा राहिलो, ''नक्षल चळवळीची ओळख शोषणापासून मुक्ती देणारी होती. पण तीच चळवळ शोषणाकडे वळल्याचे चित्र आज निर्माण झाले आहे. आदिवासी संस्कृती स्वायत्त असली

तरी त्यांच्या शोषणाचा आधार घेऊन नक्षलवाद्यांनी आपली पाळेमुळे रुजवली. विकास प्रक्रियेला नक्षलवादी चळवळीने सातत्याने खीळ घातली आहे. कारण त्यांना विकास नको आहे. विकास झाला तर आदिवासींची दिशाभूल त्यांना करता येणार नाही. जितकी विकास प्रक्रिया थोपवता येईल, तेवढी त्यांची चळवळ मजबूत होईल, होते आहे.'' असे माझे निरीक्षण मांडताना एक खंतही व्यक्त केली की, ''आदिवासींच्या या समस्येकडे अन्य समाजाने व साहित्यानेही खोलवर पाहिले नाही. संवेदनाशील बुद्धिवंतांनी समाजवास्तव समजून घेतले पाहिजे. स्वतःचे प्रश्न महत्त्वाचे वाटणे हा आत्मकेंद्रीपणा आहे आणि तो घातक आहे. म्हणूनच सामाजिक दृष्टिकोन मांडणाऱ्या साहित्यिकांनी पुढे येण्याची गरज आहे.'' हे बोलताना मात्र सुरेश द्वादशीवार, भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, उषाकिरण आत्राम, लोकनाथ यशवंत इत्यादी लेखकांच्या योगदानाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. नंतरच्या पिढीतील लेखकांनी मैत्रभाव कुणासोबत ठेवावा आणि आपले सहप्रवासी कोण असावेत याबद्दल स्पष्टता ठेवावी. फुले-शाहू-आंबेडकरांचा क्रांतिकारी विचार हाच आपला वैचारिक आधार होऊ शकतो, असेही आवाहन केले.


नक्षलवादामुळे आदिवासी संस्कृतीवर ओरखडे उमटल्याचे सांगून देवेंद्र गावंडेंनी मराठी लेखकांना धारेवर धरले. लेखक स्वतःची जात, धर्म या पलीकडे विचार करत नाहीत असे सांगताना, आदिवासींचे प्रश्न, शोषण, पोलीस, नक्षलवाद्यांशी संघर्षात भरडले जाणारे त्यांचे जीवन याचा सविस्तर, सोदाहरण उल्लेख त्यांनी केला. विवेचनाच्या ओघात, परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. अभय बंग यांच्या कामाचा आदरपूर्वक उल्लेख करून त्यांनी कळीचा मुद्दा उपस्थित केला. 'नक्षल चळवळ हिंसेकडे वळली असतानाही डॉ. प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग यांची भूमिका गुळमुळीत का आहे?' असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला. देवेंद्र गावंडेंनी एकूणच आपल्या अनुभवाच्या आणि निरीक्षणाच्या आधारे वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला. ऋषिकेश कांबळे यांनी 'आदिवासींची निकोप संस्कृती मराठी साहित्यात पुरेशा प्रमाणात आली नाही.' या वस्तुस्थितीचा निर्देश केला. या शोषणाची दखल मराठी साहित्याने घ्यावी, असे आवाहन करून देशाच्या नियोजनाच्या दिशा चुकल्याने तरुण नक्षल चळवळींकडे वळला, पण समाजातील सुसंस्कृत वर्ग गप्प राहिला तर दुसरेच कोणीतरी ताबा घेतील, अशी भीती त्यांनी वर्तवली.

परिसंवादाचा समारोप करताना डॉ. अभय बंग यांनी देवेंद्र गावंडे यांच्या आक्षेपाला थेट उत्तर देणे टाळले, आणि नक्षलवाद हा एकाएकी निर्माण होत नाही, आणि झाला तर त्याला सभोवतालची परिस्थिती कारणीभूत ठरण्यापेक्षा 'मंत्रालयात' तो जन्माला येतो, राजकीय आणि शासकीय नीतीतून नक्षलवादी जन्माला येतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले, की आपल्या साहित्यिकांनी आणि समाजाने या विषमतेत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रश्नाला भिडणे गरजेचे आहे, मात्र तसे होताना दिसत नाही. त्याऐवजी सत्ता, संपत्ती आणि राजकारणाची धुंदी सर्वत्र बघायला मिळते. ही धुंदी योग्य आहे काय? याचाही विचार अशा संमेलनातून व्हायला हवा होता.

या परिसंवादात तीन वक्ते आणि एक अध्यक्ष यांनी मांडणी केली. तब्बल अडीच तास चाललेल्या या परिसंवादाने उपस्थित श्रोत्यांना विचारप्रवृत्त आणि अंतर्मुख केले. अशा चर्चेमुळे नव्या विषयांचे दालन मराठी साहित्यात निर्माण होऊ शकते. नक्षलवाद, दहशतवाद आणि त्याचे भीषण, भयावह परिणाम मराठीत अद्यापही पुरेशा ताकदीने उमटलेले नाहीत. अशा चर्चेमुळे जर या विषयावरचे लेखन वाढले तर ती चांगली उपलब्धी म्हणावी लागेल. त्यासाठी या विषयावरील चर्चा आणि प्रश्नोत्तरे सातत्याने होत राहण्याची गरज आहे. संमेलनातील एका परिसंवादाने हा विषय ऐरणीवर घेतला असला, तरी पुढे या विषयाचे मंथन जाणकारांनी सातत्याने करत राहणे गरजेचे आहे.


**डॉ. मनोहर जाधव**
प्राध्यापक
मराठी विभाग, पुणे विद्यापीठ,
पुणे - ४११ ००७
भ्रमणध्वनी : ९८ २२ ८५० २९०
manohar2013@gmail.com






**मूल्य ७० रुपये**
**सवलतीत ४० रुपये**

**प्रत्ययपर्व** – मनोहर जाधव

सामान्य माणसाला शोधणे, सामान्य माणसातील सृजनात्म भेटणे हेच कलासाहित्याचे उद्दिष्ट आहे, असे कविवर्य नारायण सुर्वे म्हणतात.मनोहर जाधव व त्यांची कविता योग्य वाटेवर आहे असे वाटते, ते या अर्थाने!
या कवीचे वास्तवाचे, मूर्ताचे, अवतीभवतीच्या घटितांचे संवेदन जागृत आहे.
मनोहर जाधवांची कविता अशाच संवेदनांतून प्रस्थान ठेवते.

**– प्रा. रा.ग. जाधव**

# मनस्वी आणि भेदक 'कवडसे'



'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेले डॉ. महेश केळुस्करांचे 'कवडसे' लक्षवेधी आहेत. त्यांनी त्यांच्या या किंचित कवितांना दिलेलं नाव समर्पक तसंच आशयघन आहे. प्रकाशकिरणांचा जो छोटासा पुंजका आपणाला दिसतो त्याला कवडसा म्हणतात. पण केळुस्करांनी त्यांच्या दृष्टिकोनाचे टाकलेले हे कवडसे मनस्वी आणि भेदक आहेत. म्हणूनच वाचकाला विचार करायला ते प्रवृत्त करतात. आजुबाजूला असणाऱ्या, घडणाऱ्या गोष्टी आपल्या सरावाच्या असतात. किंबहुना आपलं त्याकडे लक्षही नसतं. आपलं मन जणू 'इम्यून' झालेलं असतं. म्हणूनच आपणाला त्या गोष्टी 'जाणवत' नाहीत; प्रतिभावंतांना त्या जाणवतात. त्याचा आविष्कार म्हणजेच साहित्य. एखादा छोटासा विचार केळुस्करांना जाणवतो. त्यात त्यांचाच एक स्वतंत्र दृष्टिकोन असतो. त्या गोष्टीकडे पाहण्याचा त्यांचा एक अँगल असतो. या 'कवडसे'च्या द्वारे त्यांनी त्यांचे विचार, त्यांच्या कल्पना रसिकांसमोर मांडल्या आहेत.

हातात पुस्तक आलं आणि स्तिमित होत त्या सगळ्या किंचित कविता वाचून केव्हा संपल्या हे कळलंदेखील नाही. नंतर मात्र सुन्नपणे केळुस्करांच्या विचारांवर विचारच करत राहिलो. केळुस्करांची

''नवरा निवर्तल्यावर  
कुंकू पुसलं जातं.. बांगड्या उतरवल्या जातात..  
प्रियकर मेला तर  
काय काय पुसायचं..?''

ही कविता वाचली आणि मनात विचारांचं काहूर माजलं, पण कवीच्या प्रश्नाचं उत्तर काही सापडेना!


या संग्रहातील प्रत्येक कवितेचा विषय छोटा आहे. पण आशय मोठा आहे. कोणताही फाफटपसारा न करता, कोणताही आव न आणता, जे वाटलं, उमगलं तेच आणि केवळ तेच मांडलंय! केळुस्कर कोणत्याही विषयावर, कल्पनेवर रेंगाळत राहत नाहीत. नेमकेपणे जे सांगायचं आहे ते नेमक्या शब्दात सांगितलंय. म्हणून प्रत्येक कविता रसिकाला भावणारी झाली आहे. निसर्ग, नाट्य, प्रेमाचा पहिला आविष्कार, त्यातील तृप्तता, अगतिकता, स्वभावाचे कंगोरे, जीवनानुभव, राजकारण इत्यादी अनेक विषयांना त्यांनी स्पर्श केला आहे. म्हणून तर या कविता विविधतेनं नटलेल्या आहेत. अनेक रंग त्यात आहेत. रसिकांना आणखी काय हवं असतं?

दोन दोन आळींच्या अनेक कविता या संग्रहात आहेत. ओळी म्हणजे केवळ ५-६ शब्दच. पण सगळं चित्र आपल्या डोळ्यांपुढून झर्रकन निघून जातं! आता हीच कविता पाहा ना-

''इश्शऽऽ...''  
''पुन्हा एकदा म्हण ना अजून-''

यात तात्त्विक गहनता नसेल पण विचारांची कितीतरी सखोलता आहे! केळुस्करांच्या या कविता 'त वरून ताक कळणाऱ्या' रसिकांसाठी आहेत.

**डी.एन. गांगण (गझलकार)**  
रीतीका सी-५, रंजन-रीतीका  
को.ऑप.हौ.सो.लि.,  
एस.व्ही. रोड, (दहिसर नवीन पोलिस  
स्टेशनच्या बाजूला),  
दहिसर (पूर्व), मुंबई ४०००६८  
भ्रमणध्वनी : ९३२३७ ९५९९६



**कवडसे**  
**महेश केळुस्कर**

**मूल्य ७० रु. सवलतीत ४० रु.**

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001




'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.